सर्वोत्कृष्ट संस्थेसाठी कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने दोन वेळा सन्मानित
मनुष्यबळ विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे 'स्वच्छ कॅम्पस रँकिंग २०१९' मानांकन प्राप्त

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(नॅक मानांकित 'अ' श्रेणी)

www.ycmou.ac.in

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा

बी. ए. जनसंज्ञापन व वृत्तपत्रविद्या शिक्षणक्रम (G15)

माहितीपुस्तिका

शैक्षणिक सत्र - जानेवारी २०२५



विद्यापीठ गीत

एक प्रतिज्ञा असे आमुची ज्ञानाची साधना ।
चिरंतन ज्ञानाची साधना ।
ज्ञान हेच संजीवन साऱ्या जगताच्या जीवना ॥ धृ ॥

ज्योत जागवू सुजाणतेची सकलांच्या अंतरी ।
तीच निवारील पटल तमाचे प्रभात सूर्यापरी ।
ज्ञानच देउळ, ज्ञानच दैवत, प्रगतीच्या पूजना ।। १ ।।

नव्या युगाचा नव्या जगाचा ज्ञान धर्म आहे ।
त्यातच अमुच्या उजळ उद्याचे आश्वासन राहे ।
मुक्त करिल तो परंपरेच्या बंदिघरातुन मना ॥ २ ॥

हाच मंत्र नेईल आम्हाला दिव्य भविष्याकडे ।
न्यायनीतीचे पाऊल जिथे भेदाशी ना अडे ।
जे जे मंगल पावन त्याची जेथे आराधना ।। ३ ।।

कुसुमाग्रज

निर्मिती
प्रा. नागार्जुन वाडेकर,
संचालक, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक - ४२२ २२२

निर्मिती सहाय्य
धम्मरत्न जावळे,
शैक्षणिक संयोजक (पत्रकारिता आणि जनसंज्ञापन), मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक - ४२२ २२२

© २०२४ यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
- प्रथम प्रकाशन: डिसेंबर, २०२४
- प्रकाशक : दिलीप भरड, कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक - ४२२ २२२

बी. ए. जनसंज्ञापन व वृत्तपत्रविद्या शिक्षणक्रम (G15) : माहितीपुस्तिका
शैक्षणिक सत्र - जानेवारी २०२५

अनुक्रमणिका

१. मुक्त विद्यापीठाचा परिचय
    १.१ मुक्त विद्यापीठाची उद्दिष्टे
२. विद्याशाखेचा परिचय
    २.१ विद्याशाखेची उद्दिष्टे
    २.२ विद्याशाखेची ठळक वैशिष्टे
३. अध्ययन पद्धती
    ३.१ श्रेयांक
    ३.२ अध्ययन साहित्य
४. शिक्षणक्रमाविषयी
    ४.१ शिक्षणक्रम आराखडा
    ४.२ शिक्षणक्रमाची उद्दिष्टे आणि निष्पत्ती
५. शिक्षणक्रम संरचना
    ५.१ प्रथम वर्ष अभ्यासक्रम (प्रवेश पात्रता, कालावधी, माध्यम, शिक्षणक्रम शुल्क)
    ५.२ द्वितीय वर्ष अभ्यासक्रम (प्रवेश पात्रता, कालावधी, माध्यम, शिक्षणक्रम शुल्क)
    ५.३ तृतीय वर्ष अभ्यासक्रम (प्रवेश पात्रता, कालावधी, माध्यम, शिक्षणक्रम शुल्क)
६. मूल्यमापन पद्धती
    ६.१ प्रथम वर्ष मूल्यमापन पद्धती (अंतर्गत मूल्यमापन, अंतिम मूल्यमापन)
    ६.२ द्वितीय वर्ष मूल्यमापन पद्धती (अंतर्गत मूल्यमापन, अंतिम मूल्यमापन)
    ६.३ तृतीय वर्ष मूल्यमापन पद्धती (अंतर्गत मूल्यमापन, अंतिम मूल्यमापन)
७. नोंदणी प्रक्रिया
८. शिष्यवृत्ती योजना लागू असलेले विद्यापीठाचे शिक्षणक्रम
९. ABC-ID / APAAR-ID आणि DEB-ID तयार करण्याविषयीची सूचना
१०. विशेष सूचना / संपर्कासाठी
११. सायबर सुरक्षा अभ्यासक्रम (अनिवार्य ऑडीट कोर्स)
१२. विभागीय केंद्रे
१३. परिशिष्टे
    परिशिष्ट १ : उमेदवार / विद्यार्थी करारनामा (इंग्रजी आणि मराठी)
    परिशिष्ट २ : गरीब विद्यार्थी सहाय्य योजना नियमावली
    परिशिष्ट ३ : विद्यापीठ अनुदान आयोगाचे (युजीसीचे) मान्यतापत्र (२००४)
    परिशिष्ट ४ : मुक्त विद्यापीठाच्या पदव्या व पदविकांना समकक्षता व शासनमान्यता यासंदर्भातील महाराष्ट्र शासनाचा शासन निर्णय
    परिशिष्ट ५ : पूर्वतयारीनंतर पदवी प्राप्त केल्यास १० वी / १२ वी समकक्षतेबाबतचा शासन निर्णय
    परिशिष्ट ६ : एकापेक्षा अधिक शिक्षणक्रमांना प्रवेश घेता येण्याबाबतचे दूरशिक्षण मंडळाचे ज्ञापन
    परिशिष्ट ७ : विद्यापीठ अनुदान आयोगाचे (युजीसीचे) मान्यता पत्र
    परिशिष्ट ८ : विद्यार्थी सहाय्यता आणि विद्यार्थी कल्याण योजना
    परिशिष्ट ९ : सायबर सुरक्षा अभ्यासक्रम (अनिवार्य ऑडीट कोर्स) संबंधी माहिती
    परिशिष्ट १०: सायबर सुरक्षा अभ्यासक्रमासंबंधी विद्यापीठ अनुदान आयोगाचे (युजीसीचे) पत्र
    परिशिष्ट ११: शिक्षणक्रमाचे वेळापत्रक

१. मुक्त विद्यापीठाचा परिचय

'मुक्त विद्यापीठ' ही संकल्पना नवी असून जगभरात तिचा सर्वत्र स्वीकार झाला आहे. विविध कारणांमुळे अनेकांना शिक्षण अर्धवट सोडावे लागते. ग्रामीण भागांमध्ये शैक्षणिक सुविधांचा अभाव असल्यामुळे, तसेच नोकरी-व्यवसायामुळे पुढील शिक्षण घेण्याची इच्छा असूनही ज्यांना शिक्षणापासून वंचित राहावे लागते त्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याच्या ध्येयाने मुक्त विद्यापीठे कार्यरत झाली आहेत. सन १९६९ मध्ये जगातले पहिले मुक्त विद्यापीठ इंग्लंडमध्ये स्थापन झाले. त्या पाठोपाठ चीन, जपान, कॅनडा, थायलंड, श्रीलंका, पाकिस्तान, बांगलादेश अशा अनेक देशांमध्ये मुक्त विद्यापीठे स्थापन झाली असून विविध शिक्षणक्रमांच्या संधी समाजातील इच्छुकांना दिली जात आहेत. भारतात १९८२ मध्ये हैद्राबाद (आंध्रप्रदेश) येथे पहिले मुक्त विद्यापीठ स्थापन झाले. सन १९८५ मध्ये केंद्र सरकारने राष्ट्रीय पातळीवर 'इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ' दिल्ली येथे स्थापन केले. त्यानंतर राजस्थान, बिहार, महाराष्ट्र, मध्य प्रदेश, गुजरात, कर्नाटक, पश्चिम बंगाल, उत्तरप्रदेश, तामिळनाडू, छत्तीसगढ, आसाम, उत्तराखंड, ओडीसा, पंजाब, केरळ या राज्यांत मुक्त विद्यापीठे कार्यरत झाली आहेत.

महाराष्ट्राला सामाजिक, शैक्षणिक परिवर्तन घडवणाऱ्या विचारवंतांची परंपरा लाभलेली आहे. महात्मा जोतिबा फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, डॉ. पंजाबराव देशमुख, कर्मवीर भाऊराव पाटील, स्वामी रामानंद तीर्थ यांनी अमूल्य योगदान दिले आहे. त्यांचा वारसा घेऊन खेड्यापाड्यापर्यंत उच्च शिक्षण पोहोचवण्याच्या उद्देशाने महाराष्ट्रातल्या इतर विद्यापीठांप्रमाणेच दि. १ जुलै १९८९ रोजी महाराष्ट्र शासन विधिमंडळाच्या क्रमांक २०/१९८९ अन्वये मुक्त विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. आधुनिक महाराष्ट्राचे जनक यशवंतराव चव्हाण यांचे नाव या विद्यापीठास देण्यात आले आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ हे भारतातले पाचवे आणि महाराष्ट्रातले पहिले मुक्त विद्यापीठ आहे. विद्यापीठाचे मुख्यालय नाशिक येथे असून संपूर्ण महाराष्ट्र राज्य हे या विद्यापीठाचे कार्यक्षेत्र आहे. विद्यापीठाच्या ८ विभागीय केंद्रांच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्रभरातील २४०० पेक्षा अधिक अभ्यासकेंद्रे / विद्यार्थी सहाय्यता केंद्र जोडलेली आहेत.

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) कायदा कलम १२ (ब) अन्वये यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाला मान्यता प्राप्त झाली आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्य विधीमंडळ आणि विद्यापीठ अनुदान आयोग यांनी विद्यापीठास प्रमाणपत्र, पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी तसेच संशोधन शिक्षणक्रम राबविण्यास अनुमती दिलेली आहे. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अनेक नामांकित राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय शैक्षणिक संस्थांचे सदस्य आहे. विद्यापीठाला सर्वोत्कृष्ट संस्थेसाठी कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने दोनवेळा सन्मानित करण्यात आले आहे. तसेच नुकतीच नॅक मानांकित 'अ' श्रेणी प्राप्त झाली आहे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ देशातील सर्व मान्यताप्राप्त विद्यापीठांशी समकक्ष आहे. महाराष्ट्र शासन व शासनाच्या मान्यताप्राप्त असलेल्या सर्व सरकारी, निमसरकारी, खाजगी संस्था, विविध मंडळे, इत्यादींमधील नोकऱ्यांसाठी, नोकरीत बढती मिळण्याकरिता तसेच पुढील शिक्षणासाठी या विद्यापीठाच्या पदव्या इतर विद्यापीठांच्या पदव्यांप्रमाणेच समकक्ष आहेत. महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाने त्यांच्या परीक्षांसाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे विद्यार्थी पात्र असल्याचे यापूर्वीच घोषित केले आहे. आजपर्यंत विद्यापीठाचे अनेक विद्यार्थी केंद्रीय तथा राज्य लोकसेवा आयोगाच्या विविध स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत.

राष्ट्राच्या व राज्याच्या विकास आराखड्यांशी समन्वय साधून, आपल्या विकास विषयक गरजांना अनुरूप विविध शिक्षणक्रम उपलब्ध करून देणे हे मुक्त विद्यापीठांचे ध्येय आहे. तसेच बदलते तंत्रज्ञान व त्या अनुषंगाने बदलणाऱ्या जीवनप्रणालीशी समायोजन साधण्याकरिता समाजाला ज्ञानात्मक आधार पुरविणारे शिक्षणक्रम विकसित करण्यावर मुक्त शिक्षणपध्दतीचा भर आहे. त्यामुळे 'आयुष्यभरासाठी शिक्षण', 'काम करता-करता शिक्षण', 'नोकरी व्यवसायाला आधारभूत ठरणारे कौशल्याधिष्ठित शिक्षण' ह्या संकल्पना प्रत्यक्षात आणून अध्ययनशील समाजाच्या जडणघडणीत विद्यापीठ सहभागी आहे.

'ज्ञानगंगा घरोघरी' विद्यापीठाचे ब्रीदवाक्य असून 'लोकविद्यापीठ' होण्याकडे वाटचाल करीत आहे. समाजाच्या तळागाळातील सर्वांपर्यंत गरजेनुसार शिक्षण पोहचविणे विद्यापीठाचे उद्दिष्ट आहे. मुख्यालय, विभागीय केंद्रे, जिल्हा केंद्रे, अभ्यासकेंद्रे / विद्यार्थी सहाय्यता केंद्रे, कार्यस्थळ यांच्यामार्फत विद्यापीठाचे विविध शिक्षणक्रम ग्रामीण, शहरी तसेच आदिवासी भागांतील सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे प्रयत्न केले जात आहेत. मातृभाषेतून शिक्षण उपलब्ध करून देण्याचे या विद्यापीठाचे धोरण असून 'लोकभाषेला ज्ञानभाषेचा दर्जा प्राप्त करून दिला पाहिजे' या यशवंतराव चव्हाण यांच्या शैक्षणिक तत्त्वज्ञानाला अनुसरून हे विद्यापीठ काम करीत आहे.

१.१ मुक्त विद्यापीठाची उद्दिष्टे

१. समाजातल्या शेवटच्या स्तरापर्यंत 'ज्ञानगंगा' पोहोचवून तसेच शहरी, ग्रामीण व मागास भागातील कष्टकरी, गृहिणी व अन्य प्रौढांना त्यांच्या गरजा लक्षात घेऊन सर्वसाधारण पदवी शिक्षण, व्यावसायिक, तांत्रिक व इतर शिक्षण-प्रशिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे. म्हणजेच समाजातील विविध स्तरांमधील ज्ञानात्मक विषमता दूर करण्याचे माध्यम म्हणून कार्य करणे.

२. वय, कालावधी व प्रवेश पात्रतेच्या नियमांचे जोखड दूर करून शिकण्याची इच्छा असणाऱ्या सर्वांना सहजपणे शिक्षण घेता येईल अशी लवचिक व उपक्रमशील मुक्त शिक्षणपध्दती विकसित करणे.

३. पारंपरिक विद्यापीठातील शिक्षण अपूर्ण राहिलेल्या व्यक्तींना त्यांनी पूर्ण केलेल्या शैक्षणिक भागाचे मूल्य विचारात घेऊन मुक्त विद्यापीठाच्या उपलब्ध शिक्षणक्रमात (Credit Transfer System) व पुढील शिक्षणाच्या वाटा मोकळ्या करणे.

४. अनौपचारिक व निरंतर शिक्षणामार्फत, तसेच शैक्षणिक विस्तार सेवांच्या उपक्रमांतून विविध कला-कौशल्यांचा विकास करण्याकरिता गुणात्मक शिक्षण उपलब्ध करून देणे, बदलत्या तंत्रज्ञानाशी समायोजित होण्यासाठी प्रौढांना नव्या तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देणे, भारताच्या आणि विशेषत: महाराष्ट्राच्या कला-परंपरा, सांस्कृतिक संचित आणि सामाजिक प्रबोधनाचा वारसा यांचे जतन व संवर्धन करण्याकरिता तसेच राष्ट्रीय एकात्मता व व्यक्तित्वाचा एकत्र विकास साधण्याकरिता विविध शिक्षणक्रम विकसित करणे.

५. केवळ शासकीय अनुदानावर अवलंबून न राहता आपल्या प्रशासकीय खर्चाच्या बाबतीत स्वावलंबी होण्यावर भर देऊन त्याकरिता खाजगी व सामाजिक संस्थांचा वित्तीय सहभाग मिळविणे, तसेच संगणकादी आधुनिक उपकरणांचा प्रभावी उपयोग करून किफायतशीर व गुणवत्ताधिष्ठित कार्यप्रणाली विकसित करणे.

२. विद्याशाखेचा परिचय

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेत मानवी मूल्यांसह मानवनिर्मित कला, भाषा, साहित्य, सर्जनशीलता, तसेच कुटुंबसंस्था, राज्यसंस्था, अर्थसंस्था इ. विविध संस्थांच्या रचना, तत्त्वज्ञान, इतिहास व परंपरांचा अभ्यास केला जातो. २१व्या शतकातील जागतिक आव्हानांना सामोरे जाण्यासाठी बौद्धिक पूर्वतयारी करणे आणि अध्ययनशील समाजासाठी शैक्षणिक संसाधनांचा विकास करणे हे या विद्याशाखेचे ध्येय आहे. व्यक्ती विकासावर भर देणे, व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी सहाय्यभूत ठरणे व व्यक्तिला प्रगतीपथाकडे नेणे ही या विद्याशाखेतील अभ्यासक्रमांची वैशिष्ट्ये आहेत.

२.१ विद्याशाखेची उद्दिष्ट्ये

मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखेची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत.

१. विद्यार्थीकेंद्री शिक्षणक्रम विकसित करणे.
२. मुक्त शिक्षण प्रणालीनुसार लवचिक अध्ययन व अध्यापन पद्धतींचा अवलंब करणे.
३. समाजातील अद्याप शिक्षण पोहोचले नाही अशा दुर्लक्षित घटकांपर्यंत शिक्षण पोहचविणे.
४. अध्ययनार्थीला मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे ज्ञानशाखेतील शिक्षणास प्रोत्साहित करणे.
५. नवज्ञानाधारित समाजनिर्मिती करणे.
६. दूरशिक्षणाद्वारे जनसामान्यांपर्यंत पोहोचून लोकविद्यापीठ घडविणे.

२.२ विद्याशाखेची ठळक वैशिष्टये

१. जगभरातील विविध संस्कृती, राष्ट्र-राज्यांच्या जडणघडणीचा, परंपरांचा इतिहास इत्यादींचा प्रमाणपत्र, पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पीएच.डी. शिक्षणक्रमांचा समावेश.
२. स्वातंत्र्य, समता, बंधुता, मानवी हक्क इत्यादी मूल्ये तसेच पर्यावरणरक्षणादी चळवळी, मानवी विकास निर्देशांक, शाश्वत विकासाची उद्दिष्ट्ये इत्यादी जागतिक कल्याणकारी संघटनांच्या कार्याचा समावेश.
३. स्त्रियांचे सबलीकरण, वंचितांच्या अस्मितेचे लढे, भाषा, धर्म, प्रदेशांच्या विविधतेतून एकतेसाठी रचलेले नमुना-दर्श यांचा अंतर्भाव.
४. जागतिकीकरण आणि स्थानिक विकासाची सांगड अशा विविध आशयसूत्रांचा अभ्यासक्रमांमध्ये समावेश.
५. ग्रंथालय व माहितीशास्त्र, वृत्तपत्रविद्या व जनसंज्ञापन, गांधी विचारदर्शन, मानवी हक्क अशा विशेष विषयांवर स्वतंत्र शिक्षणक्रम.
६. सिद्धांत आणि व्यवहार यांची सांगड घालणारे उपयोजित अभ्यासक्रम.

७. व्यक्तीच्या सर्जनशीलतेला व कल्पकतेला वाव देणारे अपारंपरिक अभ्यासक्रम.
८. व्यक्तिमत्त्व विकास आणि व्यावसायिक यशासाठी पूरक कौशल्यांना वाव देणारे अभ्यासक्रम.
९. स्वयं-अध्ययनासाठी लागणाऱ्या नावीन्यपूर्ण कौशल्यांचे शिक्षण.
१०. पायाभूत अभ्यासक्रमात विविध संकल्पनांचे स्पष्टीकरण देण्यावर भर.
११. स्वयंअध्ययन पुस्तके, स्वाध्याय, क्षेत्रीय कार्य, प्रकल्प अभ्यास, वेबमाध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शक सेवा व शैक्षणिक सहाय्य.
१२. प्रत्येक शिक्षणक्रमात आवडीप्रमाणे निवड करता येतील असे पर्याय.

३. अध्ययन पद्धती

विद्यार्थ्यांना दररोज महाविद्यालयात जाऊन शिक्षण घेता येत नाही, तसेच अध्ययन करण्यासाठी पूर्ण वेळ देता येत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी मुक्त विद्यापीठाने स्वतंत्रपणे अध्ययन पद्धती विकसित केलेली आहे. त्यात पुढील घटकांचा समावेश असेल. यामध्ये स्वयं-अध्ययनाधिष्ठित पाठ्यपुस्तके, तज्ज्ञ प्राध्यापकांचे संपर्कसत्रात मार्गदर्शन, अध्ययन कालांतर्गत मूल्यमापनाची सोय, आवश्यक तेथे प्रात्यक्षिकांची संधी इत्यादि घटकांचा सामावेश आहे.

अध्ययन पद्धतीत विद्यार्थ्यांना केवळ अभ्यासक्रमाचा तपशील न देता, त्यावरील अध्ययन पुस्तकांचा संचही देण्यात येतो. प्रवेश शुल्कामध्ये निवडक अध्ययन पुस्तके देण्यात येतात व ती विद्यार्थ्याला स्वतःकडे कायम ठेवता येतात. सदर अध्ययन साहित्याची सॉफ्ट कॉपी विद्यापीठाच्या ycmou.ac.in किंवा ycmou.digitaluniversity.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांनी त्याचा उपयोग करावा. ही स्वयं अध्ययन पुस्तके अन्य पुस्तकांपेक्षा वेगळ्या पद्धतीने लिहिलेली असतात. या पुस्तकांमध्ये एका वाचनात समजावून घेता येईल, अशा प्रकारे विषयांची छोट्या-छोट्या घटकांत विभागणी केलेली असते. उदाहरणार्थ आलेख, चित्रे, उदाहरणे इत्यादींच्या साहाय्याने विषयांची मांडणी सुबोधपणे करण्यात येते. विद्यार्थ्यांचे अध्ययन सुलभपणे व्हावे या दृष्टीने अशा पुस्तकांची छपाई करण्यात आलेली असते. पुस्तकात प्रत्येक पृष्ठावर दोन्ही बाजूंना मोठा समास सोडलेला असतो. कोऱ्या जागेत विद्यार्थी ठळक मुद्दे लिहून ठेवू शकतो, त्याला येणाऱ्या शंकांची नोंद करून ठेवू शकतो. अभ्यासाविषयाची आवृत्ती करताना या नोंदींची व टिपणांची त्याला मदत होते. तसेच पाठ्यांशाखाली काही प्रश्न दिलेले असतात, तो भाग वाचून झाल्यावर हे प्रश्न विद्यार्थ्यांने सोडविल्यास तो भाग आपल्याला कितपत समजला ह्याचा त्याला स्वतःलाच पडताळा घेता येतो. जर त्याला काही प्रश्न सोडविता आले नाहीत, तर त्याने तो भाग पुन्हा वाचून उत्तरे मिळवायची असतात. एवढे करूनही काही प्रश्नांची उत्तरे मिळाली नाही तर ते प्रश्न नोंदवून ठेवावेत व अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहाय्यता केंद्रावरील संपर्कसत्रात मार्गदर्शक / प्राध्यापक (समंत्रक - Counsellor) यांच्याशी चर्चा करून त्या प्रश्नांची उत्तरे मिळविता येतील.

विद्यार्थ्यांला आपल्या जवळच्या ठिकाणचे अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहाय्यता केंद्र निवडता येते. अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहाय्यता केंद्रावर प्रत्येक अभ्यासक्रमासाठी सामान्यतः सुट्टीच्या दिवशी संपर्कसत्रे घेण्यात येतात. या संपर्कसत्रात सबंधित विषयातील तज्ज्ञ मार्गदर्शक (प्राध्यापक) विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. संपर्कसत्रातील मार्गदर्शन केवळ व्याख्यानांच्या स्वरूपाचे असत नाही. मार्गदर्शकांच्या माध्यमातून आपल्या प्रश्नांची / शंकांची उत्तरे मिळविणे, कठीण विषयावर आयोजित चर्चा, परिसंवाद यात सहभाग घेणे तसेच अंतर्गत मूल्यमापनातील आपल्या प्रगतीविषयी माहिती मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांनी संपर्कसत्रांना उपस्थित राहावे.

विद्यार्थ्यांनी वरील सर्व अध्ययन सुविधांचा जास्तीत-जास्त उपयोग करून घेऊन स्वतःची अभ्यासपद्धती तयार करावी. आपल्याकडे अभ्यासासाठी असलेला वेळ लक्षात घेऊन वेळेचा नियोजनपूर्वक उपयोग करावा. केवळ पाठांतराद्वारे केलेला अभ्यास हा खरा अभ्यास नसून विषयाचे सुस्पष्ट आकलन होणे व त्याचा योग्य ठिकाणी उपयोग करता येणे, हे चांगल्या अभ्यासपद्धतीचे मर्म आहे. त्यामुळे प्रात्यक्षिके व सराव यांवर भर देऊन विद्यार्थ्यांनी अभ्यास करावा अशी अपेक्षा आहे.

३.१ श्रेयांक

मुक्त व दूरस्थ शिक्षण पद्धतीत अध्ययनतासांचे मापन 'श्रेयांका'च्या परिमाणात केले जाते. याचाच अर्थ अंदाजे ३० ते ३५ अध्ययनतासांचा अभ्यास म्हणजे १ श्रेयांक. एका श्रेयांकाचा अभ्यास करण्याकरिता विद्यार्थ्यांस सामान्यतः ३० ते ३५ घड्याळी तास लागतात. या अध्ययन तासांच्या अभ्यासात स्वयं-अध्ययन पुस्तकांचे वाचन करणे, टिपण काढणे, मनन-चिंतन करणे, अभ्यासक्रमासंदर्भातील दृकश्राव्य फिती पाहणे, इंटरनेटवरील मजकूर वाचणे, संपर्कसत्रांतील मार्गदर्शन घेणे, चर्चा करणे, प्रश्नोत्तरे लिहिणे, इत्यादी शैक्षणिक प्रयत्नांचा समावेश होतो. जनसंज्ञापन व वृत्तपत्रविद्या पदवी शिक्षणक्रम १२०

श्रेयांकांचा आहे. त्यातील १८ पाठ्यपुस्तकांचे अध्ययन १०८ श्रेयांकांचे असून उर्वरित १२ श्रेयांकांमध्ये कार्यपुस्तिका आणि प्रात्यक्षिक कामाचा समावेश आहे.

३.२ अध्ययन साहित्य

जनसंज्ञापन व वृत्तपत्रविद्या पदवी शिक्षणक्रमाचे अध्ययन साहित्य नामवंत तज्ज्ञांच्या सहभागातून विकसित करण्यात आले आहे. विद्यापीठाकडून छापील पुस्तके अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहाय्यता केंद्रावर प्राप्त होईपर्यंत विद्यार्थ्यांनी http://ycmou.digitaluniversity.ac आणि www.ycmou.ac.in या संकेतस्थळावर .pdf स्वरूपात उपलब्ध असलेली पुस्तके अभ्यासावीत.

❖ दृकश्राव्य साहित्य

विद्यापीठाने विविध विषयातील तज्ज्ञांकरवी दृकश्राव्य फीतींची (Videos) निर्मिती केलेली आहे. सर्व व्हिडीओ https://avc.ycmou.ac.in/self_learning_material/video या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत, त्याचा उपयोग करून घ्यावा.

४. शिक्षणक्रमाविषयी

विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी यासाठी विद्याशाखेने विविध पदवी शिक्षणक्रम विकसीत केले आहेत. काळानुरूप रोजगाराच्या संधी लक्षात घेऊन विद्यार्थ्यांना विविध कौशल्ये संपादित करता यावीत या हेतूने जनसंज्ञापन व वृत्तपत्रविद्या पदवी या शिक्षणक्रमाची रचना करण्यात आली आहे. तात्त्विक व उपयोजित दृष्टीने या शिक्षणक्रमातील अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील आयुष्यात उपयोगी ठरावे, या उद्देशाने अभ्यासविषयाची मांडणी केलेली आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्व विकासासाठी बौद्धिक कौशल्ये व व्यवहारिक उपयोगातील पारंगतता यातील परस्परसंबंधाची सांगड घालणे हे या शिक्षणक्रमाचे वैशिष्ट्ये आहे.

एकूण १२० श्रेयांकांचा हा शिक्षणक्रम ३ वर्षे कालावधीचा आहे. या शिक्षणक्रमासाठी प्रत्येक अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहाय्यता केंद्रावर किमान २० व कमाल ६० विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जाईल. पुरेशी विद्यार्थी संख्या नसल्यास जवळच्या अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहाय्यता केंद्रावर विद्यार्थ्यांना त्यांची पसंती असल्यास वर्ग करण्यात येईल. त्या केंद्रावर विद्यार्थ्यांना संपर्कसत्रे, अंतर्गत मूल्यमापन आणि परीक्षेसाठी जावे लागेल.

४.१ शिक्षणक्रम आराखडा

जनसंज्ञापन व वृत्तपत्रविद्या पदवी (G15) या शिक्षणक्रमाचा आराखडा पुढीलप्रमाणे.

वर्ष	अभ्यासक्रम	श्रेयांक	एकूण श्रेयांक
		तात्त्विक + प्रात्यक्षिक	
प्रथम (अधिष्ठान)	०६	३६ + ०४	४०
द्वितीय (सर्वसाधारण क्षेत्रे)	०७	३६ + ०४	४०
तृतीय (विशेष अभ्यासक्षेत्रे)	०६	३६ + ०४	४०
एकूण	**१९**	**१०८ + १२**	**१२०**

४.२ शिक्षणक्रमाची उद्दिष्टे आणि निष्पत्ती

■ शिक्षणक्रमाची उद्दिष्टे

१. मुद्रित व अमुद्रित प्रसारमाध्यमांच्या क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींना प्रसारमाध्यमांचे तत्त्वज्ञान व कार्यपद्धती याविषयी माहिती देणे.
२. वृत्तपत्रे व प्रसारमाध्यमांतील विविध कौशल्यांचा परिचय करून देणे.
३. ग्रामीण व शहरी क्षेत्रातून पत्रकार होऊ इच्छिणाऱ्यांची पत्रकारिताविषयक जाणीव वाढविणे.

४. स्थानिक, छोट्या आणि मध्यम वृत्तपत्रांना तसेच दूरचित्रवाणी आणि वेब माध्यमांना पत्रकारितेतील प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध करून देणे.
५. जनसंपर्क अधिकाऱ्यांसाठी लागणारी कौशल्ये अवगत करून देणे.
६. बातम्यांची भाषांतरे करण्यासाठी लागणारी भाषांतर कौशल्ये शिकविणे.

■ शिक्षणक्रमाची निष्पत्ती

१. प्रसारमाध्यमांच्या क्षेत्रात काम करण्यासाठी आवश्यक असणारे प्रसारमाध्यमांचे तत्त्वज्ञान समजते, तसेच त्यांतील कार्यपद्धतींची माहिती होते.
२. वृत्तपत्रे व प्रसारमाध्यमांतील विविध कौशल्ये अवगत होतात.
३. ग्रामीण व शहरी क्षेत्रातून पत्रकार होऊ इच्छिणाऱ्यांची पत्रकारिताविषयक जाणीव दृढ होते.
४. स्थानिक, छोट्या आणि मध्यम वृत्तपत्रांना तसेच दूरचित्रवाणी आणि वेब माध्यमांतील पत्रकारितेसाठी प्रशिक्षित मनुष्यबळ म्हणून काम करता येते.
५. जनसंपर्क अधिकारी होण्यासाठी आवश्यक कौशल्ये अवगत होतात.
६. बातम्यांची भाषांतरे करण्यासाठी लागणारी भाषांतर कौशल्ये अवगत होतात.

५. शिक्षणक्रम संरचना

बी. ए. जनसंज्ञापन व वृत्तपत्रविद्या पदवी शिक्षणक्रम एकूण १२० श्रेयांकांचा आहे. वार्षिक पद्धतीने राबविल्या जाणाऱ्या या शिक्षणक्रमामध्ये प्रती वर्षी ३६ इतका श्रेयांशभार असलेले तात्विक अभ्यासक्रम आहेत, तसेच प्रात्यक्षिक आणि कार्यानुभवावर आधारित असे प्रती वर्षी ०४ इतका श्रेयांशभार असलेले प्रात्यक्षिक कार्य आहेत. सदर शिक्षणक्रमात प्रत्येक वर्षाचे स्वतंत्र गुणपत्रक देण्यात येईल. मात्र पदवी परीक्षेचा निकाल फक्त दुसऱ्या व तिसऱ्या वर्षातील गुणांच्या आधारेच घोषित करण्यात येईल. संपूर्ण शिक्षणक्रमाची टक्केवारी तिसऱ्या वर्षाच्या गुणपत्रकातच नोंदवली जाईल.

५.१ प्रथम वर्ष — अधिष्ठान अभ्यासक्रम

५.१.१ प्रवेश-पात्रता (Eligibility Criteria)

बी. ए. जनसंज्ञापन व वृत्तपत्रविद्या पदवी शिक्षणक्रम - प्रथम वर्षाच्या प्रवेशासाठी खालीलपैकी कोणतीही एक पात्रता पूर्ण असणे आवश्यक —

(Fulfilling any one of the following eligibility criteria is essential for enrolling into the First Year of B.A. MCJ Program.)

१. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचा पूर्वतयारी शिक्षणक्रम उत्तीर्ण असावा.
Successful completion of Preparatory Program of Yashwantrao Chavan Maharashtra Open University.

२. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची इयत्ता बारावी (एच.एस.सी) किंवा इतर राज्यांतील समकक्ष परीक्षा उत्तीर्ण.
Standard XII Passed of Maharashtra State Board of Secondary and Higher Secondary Education (HSC) or equivalent Board Exmination from any other State.

३. १९७५ पूर्वीची माध्यमिक शालांत परीक्षा (११ वी उत्तीर्ण).
Secondary School Examination (XI) Passed before 1975.

४. एस.एस.सी. उत्तीर्ण झाल्यानंतर सलग किमान २ वर्षे मुदतीचा सरकारमान्य पदविका शिक्षणक्रम उत्तीर्ण
Successful completion of Government Recognised Diploma Program of minimum 02 consecutive years after Xth Standard (SSC)).

५.१.२ शिक्षणक्रम कालावधी

UGC Notification of Specification of Degrees, 2014 आणि UGC (ODL Programmes & OL Programmes) Regulations, 2020 **नुसार बी. ए. जनसंज्ञापन व वृत्तपत्रविद्या पदवी शिक्षणक्रम तीन वर्षांचा असला तरी तो सहा वर्षांपर्यंत पूर्ण करण्याची मुभा देण्यात आली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वरील नियमानुसार नोंदणी कालावधी संपुष्टात आल्यानंतर पुननोंदणी करता येणार नाही. अशा विद्यार्थ्यांना संबंधित शिक्षणक्रमास पुन्हा नव्याने प्रवेश घ्यावा लागेल. सदर शिक्षणक्रमासाठीचे प्रवेश हे प्रथम, द्वितीय, तृतीय अशा नैसर्गिक वाढीनेच होतील, इतर पद्धतीने प्रवेश होणार नाहीत.**

मुक्त शिक्षणपद्धतीत विद्यार्थी काम करता-करता शिक्षण घेत असल्यामुळे अध्ययन-कालावधीबाबत लवचीक धोरण ठेवण्यात आले आहे. अभ्यास पूर्ण झालेला नसल्यास वर्षअखेरीस होणारी परीक्षा त्याच वेळेस देण्याची सक्ती नाही. वर्षातून दोन वेळा परीक्षेची संधी उपलब्ध असल्याने विद्यार्थी आपल्या सोयीने योग्य वेळी परीक्षा देऊ शकतो. प्रथम वर्षाच्या सर्व अभ्यासक्रमांत अनुत्तीर्ण असला तरी आपणांस द्वितीय वर्षात प्रवेश दिला जाईल. मात्र विद्यापीठ नियमाप्रमाणे आपणास परीक्षा अर्ज भरून परीक्षा देता येईल.

५.१.३ माध्यम

सर्व अभ्यासक्रमांची स्वयं-अध्ययन पुस्तके, समंत्रकांचे अभ्यासक्रमांविषयीचे मार्गदर्शन, गृहपाठ, वर्गचाचणी व अंतिम परीक्षेच्या प्रश्नपत्रिका या मराठी भाषेतूनच राहतील. मात्र प्रश्नांची उत्तरे लिहिण्यासाठी परीक्षा विभागाच्या पूर्वपरवानगीने हिंदी किंवा इंग्रजी भाषेचा वापर करण्याचे स्वातंत्र्य राहील.

५.१.४ शिक्षणक्रम शुल्क (प्रथम वर्ष — अधिष्ठान अभ्यासक्रम)

अ. क्र.	शुल्क तपशील	शुल्क रुपये
१.	माहितीपुस्तिका शुल्क	५०.००
२.	शैक्षणिक शुल्क	११००.००
३.	पात्रता शुल्क	१००.००
४.	नोंदणी कक्ष	२००.००
५.	ओळखपत्र शुल्क	१०.००
६.	ई-सुविधा शुल्क	६०.००
७.	ग्रंथालय शुल्क	१०.००
८.	विद्यार्थी कल्याण शुल्क	५०.००
९.	मा. राज्यपाल कार्यालय उपक्रम	३८.००
१०.	क्रीडा शुल्क	५०.००
११.	संवाद पत्रिका शुल्क	१०.००
१२.	विद्यार्थी विमा योजना शुल्क	२०.००
१३.	राष्ट्रीय सेवा योजना शुल्क	१०.००
१४.	आपत्ती व्यवस्थापन शुल्क	१०.००
१५.	अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहायता केंद्र शुल्क	५००.००
१६.	परीक्षा शुल्क	१०८०.००
	एकूण शुल्क रुपये तीन हजार दोनशे अठ्ठ्यान्नव मात्र	**३२९८.००**

❖ शिक्षणक्रम शुल्कासंबंधी सूचना

अर्जदाराने प्रवेश घेत असलेल्या शिक्षणक्रमाचे प्रवेश शुल्क माहितीपुस्तिकेत नमूद केल्याप्रमाणे एकत्रित भरणे अनिवार्य आहे. या शुल्कामाध्येच अभ्यासकेंद्र/ विद्यार्थी सहाय्यता केंद्राचे शुल्क समाविष्ट आहे. त्यामुळे अभ्यासकेंद्र/ विद्यार्थी सहाय्यता केंद्रावर कोणतेही वेगळे/ अधिकचे शुल्क देण्याची आवश्यकता नाही. शुल्क भरण्याबाबतच्या सूचनेनुसार प्रवेश अर्जानंतर

दिलेल्या लिंकवरून वरील ऑनलाईन पेमेंट गेटवे वापरून क्रेडिट/ डेबिट कार्ड/ युपीआय /नेट बँकिंगद्वारे शुल्क भरावयाचे आहे. दिलेल्या लिंक व्यतिरिक्त इतर लिंकवर भरलेले शुल्क ग्राह्य धरले जाणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदाराची राहील.

ऑनलाईन पद्धतीने प्रवेश प्रक्रियेचा अवलंब करून आपला प्रवेश निश्चित करावा आणि आपण दिलेल्या मोबाईल क्रमांकावर आपला प्रवेश झाल्याचा तसेच तुमचा प्रवेश झाल्यावर येणाऱ्या कायम नोंदणी क्रमांकाचा मेसेज मिळण्याची प्रतीक्षा करावी. आपला प्रवेश निश्चित झाला किंवा कसे याबाबत निवडलेल्या अभ्यासकेंद्र/ सहाय्यता केंद्राच्या कायम संपर्कात राहावे.

५.१.५ प्रथम वर्ष (अधिष्ठान) अभ्यासक्रमांची संरचना

अ. क्र.	अभ्यासक्रम शीर्षक आणि संकेतांक	एकूण संपर्कसत्रे	तात्विक श्रेयांक
१.	स्वयं अध्ययन कौशल्यांचा अभ्यासक्रम (OPN101)	०६	०६
२.	मराठी भाषेचा अधिष्ठान अभ्यासक्रम (MAR101)	०९	०६
३.	हिंदी व इंग्रजी भाषांचा अधिष्ठान अभ्यासक्रम (HEN101)	०९	०६
४.	सामान्यज्ञान व सामाजिक जाणिवांचा अधिष्ठान अभ्यासक्रम (GKN101)	०९	०६
५.	सामाजिकशास्त्रांचा अधिष्ठान अभ्यासक्रम (SOC101)	१०	०६
६.	मानव्यविद्यांचा अधिष्ठान अभ्यासक्रम (HUM101)	११	०६

टीप :

- एकूण ३६ श्रेयांकांचे असून यात प्रत्येकी ६ श्रेयाकांचे ६ अनिवार्य अभ्यासक्रम आहेत.
- HEN101 या अभ्यासक्रमातील इंग्रजीसाठी ५ व हिंदीसाठी ४ संपर्कसत्रे निर्धारित केली आहेत.

प्रथम वर्ष — अधिष्ठान अभ्यासक्रम आणि स्वयं-अध्ययन साहित्याची यादी

➢ प्रथम वर्ष (अधिष्ठान अभ्यासक्रम)

०१. स्वयं अध्ययन कौशल्यांचा अभ्यासक्रम (OPN101)

पुस्तक १: वाचन व लेखन कौशल्ये

पुस्तक २ : संभाषण व श्रवण कौशल्ये

पुस्तक ३ : निरीक्षण, ग्रंथालय उपयोजन व स्वयंनिर्देशित अध्ययन

०२. मराठी भाषेचा अधिष्ठान अभ्यासक्रम (MAR101)

पुस्तक १ : भाषिक विनिमय: तत्त्व आणि व्यवहार

पुस्तक २ : मराठीचा भाषिक वापर (कार्यपुस्तिका)

पुस्तक ३ : भाषिक सर्जनशीलता : स्वरूप व प्रकार

पुस्तक ४ : मराठी भाषेचा सर्जनशील वापर (कार्यपुस्तिका)

०३. हिंदी व इंग्रजी भाषांचा अधिष्ठान अभ्यासक्रम (HEN101)

पुस्तक १ : हिंदी भाषा का परिचय और उसकी संरचना

पुस्तक २ : कार्यपुस्तिका

पुस्तक ३ : Foundation Course in English

पुस्तक ४ : Work Book

०४. सामान्यज्ञान व सामाजिक जाणिवांचा अधिष्ठान अभ्यासक्रम (GKN101)

पुस्तक १ : विज्ञान, तंत्रज्ञान, पर्यावरण आणि आरोग्य

पुस्तक २ : विकास : संकल्पना आणि मार्ग

पुस्तक ३ : संज्ञापनक्रांती व जैव तंत्रज्ञान

०५. मानव्यविद्यांचा अधिष्ठान अभ्यासक्रम (HUM101)

पुस्तक १ : मानव्यविद्या व ललित कलांचा परिचय

पुस्तक २ : प्रयोगाधिष्ठित व यंत्राधिष्ठित कला

पुस्तक ३ : कार्यपुस्तिका

०६. सामाजिकशास्त्रांचा अधिष्ठान अभ्यासक्रम (SOC101)

पुस्तक १ : इतिहास व राज्यशास्त्र

पुस्तक २ : समाजशास्त्र व मानसशास्त्र

पुस्तक ३ : अर्थशास्त्र व भूगोल

५.२ द्वितीय वर्ष – सर्वसाधारण अभ्यासक्षेत्रे

५.२.१ प्रवेश-पात्रता (Eligibility Criterion)

बी.ए. जनसंज्ञापन व वृत्तपत्रविद्या पदवी शिक्षणक्रम द्वितीय वर्षाच्या प्रवेशासाठी खालील पात्रता पूर्ण असणे आवश्यक:

Fullfiling the following eligibility criterion is essential for enrolling into the Second Year of B.A. MCJ Program.

१. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात यापूर्वी प्रथम वर्षास प्रवेश घेतलेले सर्व विद्यार्थी.

All such students who had enrolled into the First Year of B. A. Degree of Yashwantrao Chavan Maharashtra Open University.

५.२.२ शिक्षणक्रम कालावधी

UGC Notification of Specification of Degrees, 2014 आणि UGC (ODL Programmes & OL Programmes) Regulations, 2020 **नुसार बी. ए. जनसंज्ञापन व वृत्तपत्रविद्या पदवी शिक्षणक्रम तीन वर्षांचा असला तरी तो सहा वर्षांपर्यंत पूर्ण करण्याची मुभा देण्यात आली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वरील नियमानुसार नोंदणी कालावधी संपुष्टात आल्यानंतर पुनर्नोंदणी करता येणार नाही. अशा विद्यार्थ्यांना संबंधित शिक्षणक्रमास पुन्हा नव्याने प्रवेश घ्यावा लागेल. सदर शिक्षणक्रमासाठीचे प्रवेश हे प्रथम, द्वितीय, तृतीय अशा नैसर्गिक वाढीनेच होतील, इतर पद्धतीने प्रवेश होणार नाहीत.**

मुक्त शिक्षणपद्धतीत विद्यार्थी काम करता-करता शिक्षण घेत असल्यामुळे अध्ययन-कालावधीबाबत लवचीक धोरण ठेवण्यात आले आहे. अभ्यास पूर्ण झालेला नसल्यास वर्षअखेरीस होणारी परीक्षा त्याच वेळेस देण्याची सक्ती नाही. वर्षातून दोन वेळा परीक्षेची संधी उपलब्ध असल्याने विद्यार्थी आपल्या सोयीने योग्य वेळी परीक्षा देऊ शकतो. प्रथम वर्षाच्या सर्व अभ्यासक्रमांत अनुत्तीर्ण असला तरी आपणांस द्वितीय वर्षात प्रवेश दिला जाईल. मात्र विद्यापीठ नियमाप्रमाणे आपणास परीक्षा अर्ज भरून परीक्षा देता येईल.

५.२.३ माध्यम

सर्व अभ्यासक्रमांची स्वयं-अध्ययन पुस्तके, समंत्रकांचे अभ्यासक्रमांविषयीचे मार्गदर्शन, गृहपाठ, वर्गचाचणी व अंतिम परीक्षेच्या प्रश्नपत्रिका या मराठी भाषेतूनच राहतील. मात्र प्रश्नांची उत्तरे लिहिण्यासाठी परीक्षा विभागाच्या पूर्वपरवानगीने हिंदी किंवा इंग्रजी भाषेचा वापर करण्याचे स्वातंत्र्य राहील.

५.२.४ शिक्षणक्रम शुल्क (द्वितीय वर्ष - सर्वसाधारण अभ्यासक्षेत्रे)

अ. क्र.	शुल्क तपशील	शुल्क रुपये
१.	माहितीपुस्तिका शुल्क	५०.००
२.	शैक्षणिक शुल्क	२६००.००
३.	नोंदणी शुल्क	२००.००
४.	ई-सुविधा शुल्क	६०.००
५.	ग्रंथालय शुल्क	१०.००
६.	विद्यार्थी कल्याण शुल्क	५०.००
७.	मा. राज्यपाल कार्यालय उपक्रम	३८.००
८.	क्रीडा शुल्क	५०.००
९.	संवाद पत्रिका शुल्क	१०.००
१०.	विद्यार्थी विमा योजना शुल्क	२०.००
११.	राष्ट्रीय सेवा योजना शुल्क	१०.००
१२.	आपत्ती व्यवस्थापन शुल्क	१०.००
१३.	अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहायता केंद्र शुल्क	१०००.००
१४.	परीक्षा शुल्क	१२६०.००
	एकूण शुल्क रुपये पाच हजार तीनशे अडूसष्ठ मात्र	**५३६८.००**

❖ शिक्षणक्रम शुल्कासंबंधी सूचना

अर्जदाराने प्रवेश घेत असलेल्या शिक्षणक्रमाचे प्रवेश शुल्क माहितीपुस्तिकेत नमूद केल्याप्रमाणे एकत्रित भरणे अनिवार्य आहे. या शुल्कामाध्येच अभ्यासकेंद्र/ विद्यार्थी सहाय्यता केंद्राचे शुल्क समाविष्ट आहे. त्यामुळे अभ्यासकेंद्र/ विद्यार्थी सहाय्यता केंद्रावर कोणतेही वेगळे/ अधिकचे शुल्क देण्याची आवश्यकता नाही. शुल्क भरण्याबाबतच्या सूचनेनुसार प्रवेश अर्जानंतर दिलेल्या लिंकवरून वरील ऑनलाईन पेमेंट गेटवे वापरून क्रेडिट/ डेबिट कार्ड/ युपीआय /नेट बँकिंगद्वारे शुल्क भरावयाचे आहे. दिलेल्या लिंक व्यतिरिक्त इतर लिंकवर भरलेले शुल्क ग्राह्य धरले जाणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदाराची राहील.

ऑनलाईन पद्धतीने प्रवेश प्रक्रियेचा अवलंब करून आपला प्रवेश निश्चित करावा आणि आपण दिलेल्या मोबाईल क्रमांकावर आपला प्रवेश झाल्याचा तसेच तुमचा प्रवेश झाल्यावर येणाऱ्या कायम नोंदणी क्रमांकाचा मेसेज मिळण्याची प्रतीक्षा करावी. आपला प्रवेश निश्चित झाला किंवा कसे याबाबत निवडलेल्या अभ्यासकेंद्र/ सहाय्यता केंद्राच्या कायम संपर्कात राहावे.

५.२.५ द्वितीय वर्ष (सर्वसाधारण अभ्यासक्षेत्रे) अभ्यासक्रमांची संरचना

अ. क्र.	अभ्यासक्रम शीर्षक आणि संकेतांक	एकूण संपर्कसत्रे	तात्विक श्रेयांक
१.	वृत्तपत्रव्यवसाय व पत्रकारिता (MCJ201)	०९	०६
२.	बातमीची विविध कार्यक्षेत्रे (MCJ202)	०९	०६
३.	आधुनिक महाराष्ट्र (MCJ203)	०९	०६
४.	आधुनिक भारत (MCJ204)	०९	०६
५.	मुद्रित माध्यमांसाठी लेखनकौशल्ये (MCJ205)	०९	०६
६.	दृक-श्राव्य माध्यमे स्वरूप व कौशल्ये (MCJ206)	०९	०६
७.	पर्यावरण अभ्यास (EVS201)*	-	-

*पर्यावरण अभ्यास (EVS201) या अनिवार्य अभ्यासक्रमासाठी २० गुणांचा गृहपाठ तर ८० गुणांची लेखी परीक्षा असेल. या अभ्यासक्रमाचे गुण अंतिम श्रेणी ठरविताना ग्राह्य धरले जाणार नाहीत. तथापि यात 'सी' श्रेणी मिळवणे अनिवार्य असेल.

द्वितीय वर्ष (सर्वसाधारण अभ्यासक्षेत्रे) अभ्यासक्रम आणि स्वयं-अध्ययन साहित्याची यादी

➢ द्वितीय वर्ष : सर्वसाधारण अभ्यासक्षेत्रे

०१. वृत्तपत्रव्यवसाय व पत्रकारिता (MCJ201)

पुस्तक १ : वृत्तपत्रव्यवसाय, स्वरूप व व्यवस्थापन
पुस्तक २ : बातमी व बातमीदार
पुस्तक ३ : ग्रामीण पत्रकारिता

०२. बातमीची विविध कार्यक्षेत्रे (MCJ202)

पुस्तक १ : बातमीची सर्वसाधारण कार्यक्षेत्रे
पुस्तक २ : कृषी, सहकार व अर्थ-वाणिज्य क्षेत्रे
पुस्तक ३ : क्रीडा पत्रकारिता

०३. आधुनिक महाराष्ट्र (MCJ203)

पुस्तक १ : आधुनिक महाराष्ट्र : लोकप्रशासन व अर्थकारण
पुस्तक २ : प्रबोधन परंपरा व वृत्तपत्रसृष्टीची वाटचाल
पुस्तक ३ : कला व साहित्य

०४. आधुनिक भारत (MCJ204)

पुस्तक १ : भारताचे राजकारण
पुस्तक २: आंतरराष्ट्रीय राजकारण व भारताचे परराष्ट्रसंबंध
पुस्तक ३ : भारताचे अर्थकारण, समाजकारण व संस्कृती

०५. मुद्रित माध्यमांसाठी लेखनकौशल्ये (MCJ205)

पुस्तक १: वृतपत्रे वार्तालेख व सदरलेखन
पुस्तक २ : अग्रलेख, स्फुटलेख वाचकांची पत्रे
पुस्तक ३ : भाषा व भाषांतर

०६. दृक-श्राव्य माध्यमे स्वरूप व कौशल्ये (MCJ206)

पुस्तक १: नभोवाणी
पुस्तक २: दूरचित्रवाणी व माहितीपट
पुस्तक ३ : स्वरसाधना व सादरीकरण कौशल्ये

०७. पर्यावरण अभ्यास (EVS201)

पर्यावरण अभ्यास (EVS201) या अनिवार्य अभ्यासक्रमासाठी २० गुणांचा गृहपाठ तर ८० गुणांची लेखी परीक्षा असेल. या अभ्यासक्रमाचे गुण अंतिम श्रेणी ठरविताना ग्राह्य धरले जाणार नाहीत. तथापि यात 'सी' श्रेणी मिळवणे अनिवार्य असेल.

५.३ तृतीय वर्ष (विशेष अभ्यासक्षेत्रे)

५.३.१ प्रवेश-पात्रता (Eligibilty Criterion)

बी.ए. जनसंज्ञापन व वृत्तपत्रविद्या पदवी शिक्षणक्रम तृतीय वर्षाच्या प्रवेशासाठी खालील पात्रता पूर्ण असणे आवश्यक - Fullfiling the following eligibility criterion is essential for enrolling into the Third Year of B.A. MCJ Program-

१. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात यापूर्वी बी. ए. जनसंज्ञापन व वृत्तपत्रविद्या पदवी शिक्षणक्रमाच्या द्वितीय वर्षात प्रवेश घेतलेले सर्व विद्यार्थी.

All such students who had enrolled into the Second Year of B. A. Mass Communication and Journalism Degree program of Yashwantrao Chavan Maharashtra Open University.

५.३.२ शिक्षणक्रम कालावधी

UGC Notification of Specification of Degrees, 2014 आणि UGC (ODL Programmes & OL Programmes) Regulations, 2020 **नुसार बी. ए. जनसंज्ञापन व वृत्तपत्रविद्या पदवी शिक्षणक्रम तीन वर्षांचा असला तरी तो सहा वर्षांपर्यंत पूर्ण करण्याची मुभा देण्यात आली आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या वरील नियमानुसार नोंदणी कालावधी संपुष्टात आल्यानंतर पुनर्नोंदणी करता येणार नाही. अशा विद्यार्थ्यांना संबंधित शिक्षणक्रमास पुन्हा नव्याने प्रवेश घ्यावा लागेल. सदर शिक्षणक्रमासाठीचे प्रवेश हे प्रथम, द्वितीय, तृतीय अशा नैसर्गिक वाढीनेच होतील, इतर पद्धतीने प्रवेश होणार नाहीत.**

मुक्त शिक्षणपद्धतीत विद्यार्थी काम करता-करता शिक्षण घेत असल्यामुळे अध्ययन-कालावधीबाबत लवचीक धोरण ठेवण्यात आले आहे. अभ्यास पूर्ण झालेला नसल्यास वर्षअखेरीस होणारी परीक्षा त्याच वेळेस देण्याची सक्ती नाही. वर्षातून दोन वेळा परीक्षेची संधी उपलब्ध असल्याने विद्यार्थी आपल्या सोयीने योग्य वेळी परीक्षा देऊ शकतो. प्रथम वर्षाच्या सर्व अभ्यासक्रमांत अनुत्तीर्ण असला तरी आपणांस द्वितीय वर्षात प्रवेश दिला जाईल. मात्र विद्यापीठ नियमाप्रमाणे आपणास परीक्षा अर्ज भरून परीक्षा देता येईल.

५.३.३ माध्यम

सर्व अभ्यासक्रमांची स्वयं-अध्ययन पुस्तके, समंत्रकांचे अभ्यासक्रमांविषयीचे मार्गदर्शन, गृहपाठ, वर्गचाचणी व अंतिम परीक्षेच्या प्रश्नपत्रिका या मराठी भाषेतूनच राहतील. मात्र प्रश्नांची उत्तरे लिहिण्यासाठी परीक्षा विभागाच्या पूर्वपरवानगीने हिंदी किंवा इंग्रजी भाषेचा वापर करण्याचे स्वातंत्र्य राहील.

५.३.४ शिक्षणक्रम शुल्क (तृतीय वर्ष - विशेष अभ्यासक्षेत्रे)

अ. क्र.	शुल्क तपशील	शुल्क रुपये
१.	माहितीपुस्तिका शुल्क	५०.००
२.	शैक्षणिक शुल्क	२६००.००
३.	नोंदणी शुल्क	२००.००
४.	ई-सुविधा शुल्क	६०.००
५.	ग्रंथालय शुल्क	१०.००
६.	विद्यार्थी कल्याण शुल्क	५०.००
७.	मा. राज्यपाल कार्यालय उपक्रम	३८.००
८.	क्रीडा शुल्क	५०.००
९.	संवाद पत्रिका शुल्क	१०.००
१०.	विद्यार्थी विमा योजना शुल्क	२०.००
११.	राष्ट्रीय सेवा योजना शुल्क	१०.००
१२.	आपत्ती व्यवस्थापन शुल्क	१०.००
१३.	अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहायता केंद्र शुल्क	१५००.००
१४.	परीक्षा शुल्क	१०८०.००
१५.	पदवी-प्रदान शुल्क	४५०.००
१६.	माजी विद्यार्थी संघ शुल्क	१०.००
	एकूण शुल्क सहा हजार एकशे अठ्ठेचाळीस रुपये मात्र	**६१४८.००**

❖ शिक्षणक्रम शुल्कासंबंधी सूचना

अर्जदाराने प्रवेश घेत असलेल्या शिक्षणक्रमाचे प्रवेश शुल्क माहितीपुस्तिकेत नमूद केल्याप्रमाणे एकत्रित भरणे अनिवार्य आहे. या शुल्कामाध्येच अभ्यासकेंद्र/ विद्यार्थी सहाय्यता केंद्राचे शुल्क समाविष्ट आहे. त्यामुळे अभ्यासकेंद्र/ विद्यार्थी सहाय्यता केंद्रावर कोणतेही वेगळे/ अधिकचे शुल्क देण्याची आवश्यकता नाही. शुल्क भरण्याबाबतच्या सूचनेनुसार प्रवेश अर्जानंतर दिलेल्या लिंकवरून वरील ऑनलाईन पेमेंट गेटवे वापरून क्रेडिट/ डेबिट कार्ड/ युपीआय /नेट बँकिंगद्वारे शुल्क भरावयाचे आहे. दिलेल्या लिंक व्यतिरिक्त इतर लिंकवर भरलेले शुल्क ग्राह्य धरले जाणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदाराची राहील.

ऑनलाईन पद्धतीने प्रवेश प्रक्रियेचा अवलंब करून आपला प्रवेश निश्चित करावा आणि आपण दिलेल्या मोबाईल क्रमांकावर आपला प्रवेश झाल्याचा तसेच तुमचा प्रवेश झाल्यावर येणाऱ्या कायम नोंदणी क्रमांकाचा मेसेज मिळण्याची प्रतीक्षा करावी. आपला प्रवेश निश्चित झाला किंवा कसे याबाबत निवडलेल्या अभ्यासकेंद्र/ सहाय्यता केंद्राच्या कायम संपर्कात राहावे.

५.३.५ तृतीय वर्ष (विशेष अभ्यासक्षेत्रे) अभ्यासक्रमाची संरचना

अ. क्र.	अभ्यासक्रम शीर्षक आणि संकेतांक	एकूण संपर्कसत्रे	तात्विक श्रेयांक
१.	जनसंज्ञापन व विकास संज्ञापन (MCJ301)	०९	०६
२.	भारतीय राज्यघटना आणि शासनव्यवहार (MCJ302)	०९	०६
३.	पत्रकारिता : कायदे आणि नीतिमूल्ये (MCJ303)	०९	०६
४.	पत्रकारिता आणि संबंधित कार्यक्षेत्रे (MCJ304)	०९	०६
५.	संपादन : स्वरूप व कौशल्ये (MCJ305)	०९	०६
६.	प्रसारमाध्यमांतील संगणकीय उपयोजन व मुद्रणतंत्रे (MCJ306)	०९	०६

तृतीय वर्ष (विशेष अभ्यासक्षेत्रे) अभ्यासक्रम आणि स्वयं-अध्ययन साहित्याची यादी

➢ तृतीय वर्ष : विशेष अभ्यासक्षेत्रे

०१. जनसंज्ञापन व विकास संज्ञापन (MCJ301)

पुस्तक १ : संज्ञापन, जनसंज्ञापन व विकास संज्ञापन

पुस्तक २ : संज्ञापनक्रांती स्वरूप व परिणाम

पुस्तक ३ : प्रसारमाध्यमांचे अर्थकारण

०२. भारतीय राज्यघटना आणि शासनव्यवहार (MCJ302)

पुस्तक १ : भारतीय राज्यघटनेची चौकट

पुस्तक २: संसदीय कामकाज

पुस्तक ३ : प्रशासकीय संरचना व कामकाज

०३. पत्रकारिता : कायदे आणि नीतिमूल्ये (MCJ303)

पुस्तक १ : प्रसारमाध्यमांशी संबंधित कायदे

पुस्तक २ : मानवी हक्क

पुस्तक ३ : पत्रकारितेची नीतिमूल्ये

०४. पत्रकारिता आणि संबंधित कार्यक्षेत्रे (MCJ304)

पुस्तक १ : जाहिरात

पुस्तक २ : जनसंपर्क

पुस्तक ३ : छायाचित्र पत्रकारिता

०५. संपादन : स्वरूप व कौशल्ये (MCJ305)

पुस्तक १ : वृत्तपत्राचे संपादन

पुस्तक २ : नियतकालिकांचे संपादन

पुस्तक ३ : ग्रंथनिर्मिती व संपादन

०६. प्रसारमाध्यमांतील संगणकीय उपयोजन व मुद्रणतंत्रे (MCJ306)

पुस्तक १ : संगणक रचना व उपयोजन

पुस्तक २ : ग्राफिक्स व डिझाईन

पुस्तक ३ : मुद्रणतंत्रे

६. मूल्यमापन प्रक्रिया

तीन वर्षे कालावधी असणाऱ्या बी. ए. जनसंज्ञापन व वृत्तपत्रविद्या पदवी शिक्षणक्रमामध्ये प्रत्येक वर्षी विद्यार्थ्यांचे मूल्यमापन हे अंतिम मूल्यमापन आणि अंतर्गत मूल्यमापन अशा दोन पातळ्यांवर केले जाईल. अंतर्गत मूल्यमापनासाठी सादर करावयाच्या अभ्यासक्रमनिहाय स्वाध्याय आणि प्रात्यक्षिक कार्याचे तपशील खाली दिले आहेत. तसेच, अंतिम मूल्यमापनासाठी घेण्यात येणाऱ्या अंतिम लेखी परीक्षेतील प्रश्नपत्रिकेचे स्वरूप सोबत दिले आहे.

६.१ प्रथम वर्ष मूल्यमापन पद्धती

६.१.१ अंतर्गत मूल्यमापन पद्धती

अंतर्गत मूल्यमापनात उत्तीर्ण होण्याकरिता किमान ४०% गुण मिळविणे अनिवार्य असेल. अंतर्गत मूल्यमापनाअंतर्गत २० पैकी मिळालेले गुण गुणपत्रिकेत (Continous Assessment – CA) स्वतंत्रपणे दर्शविण्यात येतील. अंतर्गत मूल्यमापनात मिळालेले गुण अंतिम परीक्षेत मिळालेल्या गुणांसोबत एकत्रितपणे गुणपत्रिकेत दर्शविण्यात येतील. अंतर्गत मूल्यमापन व अंतिम मूल्यमापनात प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे अंतिम निकाल जाहीर करण्यात येईल. विद्यापीठाने अंतर्गत मूल्यमापन सादर करण्याबाबत काही बदल केल्यास त्याबाबतच्या सविस्तर सूचना संकेतस्थळावर तसेच आपल्या अभ्यासकेंद्र/ विद्यार्थी सहायता केंद्रावर दिल्या जातील.

अभ्यासकेंद्र/ विद्यार्थी सहायता केंद्रावरील संमंत्रकांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करावयाच्या प्रात्यक्षिकांचे व कार्यानुभवाचे मूल्यांकन अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहायता केंद्रावरील संमंत्रकांनीच करावयाचे आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे:

प्रथम वर्ष (अधिष्ठान अभ्यासक्रम)

क्र.	अभ्यासक्रम संकेतांक	प्रात्यक्षिक / कार्यानुभवाचे स्वरूप	गुण	श्रेयांक
१.	OPN101(P)	(१) गृहपाठ	२५	०१
२.	GKN101(P)	(१) गृहपाठ	२५	
३.	MAR102(P)	(i) मराठीचा भाषिक वापर : कार्यपुस्तिका (ii) मराठी भाषेचा सर्जनशील वापर : कार्यपुस्तिका	२५ २५	०१
४.	HEN101(P)	(iii) हिंदी : कार्यपुस्तिका (iv) इंग्रजी : कार्यपुस्तिका	२५ २५	०१
५.	HUM101(P) SOC101(P)	(v) मानव्यविद्या : कार्यपुस्तिका (vi) सामाजिकशास्त्रे : गृहपाठ	२५ २५	०१
एकूण			**२००**	**०४**

❖ अभ्यासक्रमनिहाय अंतर्गत मूल्यमापन

विद्यार्थ्यांनी गृहपाठ, कार्यपुस्तिका, क्षेत्रीय सर्वेक्षण, कात्रणसंग्रह, पाहणी अहवालांच्या माध्यमातून प्रकल्प पद्धतीने अभ्यास करावयाचा आहे. त्याचे अभ्यासक्रमनिहाय स्वाध्याय व मूल्यमापनाचे तपशील खाली दिलेले आहेत. विद्यार्थ्यांनी अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहायता केंद्रावरील समंत्रकांच्या मार्गदर्शनाखाली हा अभ्यास पूर्ण करून त्यांच्याकडे आपापले प्रकल्प, कार्यपुस्तिका मूल्यमापनासाठी दिलेल्या मुदतीत सादर करावयाचे आहेत. अंतर्गत मूल्यमापनासाठीचे कार्य विद्यार्थ्याने निर्धारित मुदतीत अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहायता केंद्रावर सादर करून संबंधित समंत्रकांकडून गुणदान करून घ्यावे.

(अ) प्रथम वर्ष (अधिष्ठान अभ्यासक्रम)

➢ OPN101: स्वयं-अध्ययन कौशल्ये: गृहपाठ (२५ गुण)

खालीलपैकी कोणताही एक गृहपाठ पूर्ण करा.

१. तुम्ही वाचलेल्या कुठल्याही एका पुस्तकाचा ५०० शब्दांत परिचय करून द्या.

२. तुम्ही दूरचित्रवाणीवर पाहत असलेल्या कुठल्याही एका मालिकेचे / कार्यक्रमाचे ५०० शब्दांत खालील मुद्यांच्या आधारे शब्दांकन करा.

(विषय, कथानक, स्वभावदर्शन, जीवनविषयक दृष्टिकोन, मूल्ये, सादरीकरण शैली, इत्यादी.)

३. आपल्या रोजच्या जीवनात आढळणाऱ्या किमान २५ प्रतीकांचा / संकेतचिन्हांचा संग्रह करा. त्या प्रतीकांचा अर्थ व उपयोग त्या त्या चिन्हांसमोर लिहा.

(उदा. भारताचा राष्ट्रध्वज. आपण तिरंगा झेंड्याचे चित्र चिकटवावे. त्यासमामोर केशरी, पांढरा, हिरवा या तीन रंगांचा व अशोकचक्राच्या योजनेचा संकेतार्थ लिहावा.)

४. ग्रंथालयातील माहितीच्या आधारे खालीलपैकी कोणत्याही एका व्यक्तीचा जीवनपट तयार करा.

(क) म. गांधी, (ख) डॉ. बाबासाहेब आंबेडकर, (ग) मदर तेरेसा, (घ) रवींद्रनाथ टागोर, (च) डॉ. अब्दुल कलाम, (छ) बाळशास्त्री जांभेकर, (ज) प्रबोधनकार ठाकरे, (झ) प्र.के. अत्रे, (ट) अजिंक्य रहाणे, (ठ) कुमार गंधर्व, (ड) व्ही. शांताराम, (ढ) इंदिरा गांधी, (ण) महर्षी धोंडो केशव कर्वे, (त) र.धों. कर्वे, (थ) दुर्गा भागवत, (द) प्रेमचंद, (ध) यशवंतराव चव्हाण, (न) केदार जाधव, (प) विंदा करंदीकर, (फ) बाबा आमटे, (भ) अजीम प्रेमजी.

➢ GKN101: सामान्यज्ञान व सामाजिक जाणीव : गृहपाठ (२५ गुण)

१. खालीलपैकी एका विषयावर कात्रणसंग्रह तयार करा. जमवलेल्या कात्रणांच्या आधारे किमान पाचशे शब्दांचा विश्लेषणात्मक वृत्तलेख लिहा.

(क) पर्यावरण	(ख) प्रदूषण
(ग) आरोग्य	(घ) विज्ञान
(च) साहित्य	(छ) धर्म
(ज) जैवतंत्रज्ञान	(झ) सहकार
(ट) मानवी हक्क	(ठ) ग्राहक चळवळ
(ड) कला	(ढ) क्रीडा

➢ MAR101: मराठी (५० गुण)

(१) मराठीचा भाषिक वापर : कार्यपुस्तिका : २५ गुण

(२) मराठी भाषेचा सर्जनशील वापर : कार्यपुस्तिका : २५ गुण

➢ HEN101: हिंदी – इंग्रजी (५० गुण)

(१) हिंदी : कार्यपुस्तिका : २५ गुण

(२) इंग्रजी : कार्यपुस्तिका : २५ गुण

➢ **HUM101: मानव्यविद्या**

(१) कार्यपुस्तिका : २५ गुण

➢ **SOC101: सामाजिकशास्त्रे: गृहपाठ (२५ गुण)**

खालीलपैकी कोणताही एक गृहपाठ पूर्ण करा.

१. जानेवारी ते डिसेंबर या कालखंडात घडलेल्या ठळक घटना-घडामोडींचा कालपट तयार करा. (या कालपटात राजकारण, शिक्षण, नैसर्गिक आपत्ती, पुरस्कार, युद्ध-घात, कला-क्रीडा व संस्कृती क्षेत्रातील उल्लेखनीय घडामोडी, थोरा-मोठ्यांचे मृत्यू, इत्यादींचा समावेश असावा.)

२. कुठल्याही एका क्षेत्रातील ठळक घडामोडींचा कालपट तयार करा. (उदाहरणार्थ, ऑलिंपिक स्पर्धा-प्रारंभापासून आजपर्यंत, क्रिकेट / टेनिस वर्ल्ड-कप प्रारंभापासून-आजपर्यंत. मराठी साहित्य संमेलने-प्रारंभापासून ते आजपर्यंत, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची अधिवेशने-प्रारंभापासून ते आजपर्यंत, विज्ञानाची नोबेल पारितोषिके, ज्ञानपीठ पारितोषिके, इत्यादी)

३. 'भारतीय राज्यघटना' या विषयावर ५०० शब्दांचा निबंध लिहा.

४. भारतीय राज्यघटनेतील विविध घटना दुरुस्त्यांची यादी करा.

५. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर किमान ५०० शब्दांचा निबंध लिहा.
(क) शहरीकरणाच्या समस्या, (ख) शेतकऱ्यांच्या समस्या,(ग) समाजातील अंधश्रद्धांचे स्वरूप, (घ) धार्मिक कर्मकांड व रूढी परंपरा, (च) बदलती कुटुंबसंस्था, (छ) आदिवासींचे लोकजीवन, (ज) आधुनिकीकरणाचा जीवनशैलीवरील परिणाम, (झ) शालेय शिक्षणातील गळती-स्थगिती (ट) आरोग्ययंत्रणा, (ठ) सोशल मीडिया.

६. मानसशास्त्रातील व्यक्तिमत्त्व संकल्पनेच्या आधारे तुम्हाला भावलेल्या कुठल्याही एका व्यक्तिमत्त्वाचे गुणविशेष स्पष्ट करा.

७. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निरीक्षणात्मक निबंध लिहा.
(क) ग्राहकाचे मानसशास्त्र, (ख) खेळाचे मानसशास्त्र, (ग) गुन्हेगारीचे मानसशास्त्र, (घ) दूरचित्रवाणीच्या दर्शकांचे मानसशास्त्र

६.१.२ अंतिम मूल्यमापन पद्धती

अंतिम परीक्षा साधारणतः मे महिन्यात असेल. प्रत्येक वर्षाच्या सहा अभ्यासक्रमांसाठी ६ प्रश्नपत्रिका असतील. प्रती अभ्यासक्रम ८० गुणांची ३ तास वेळ असणारी अंतिम परीक्षा असेल. प्रत्येक प्रश्नपत्रिकेत २० गुणांचे चार प्रश्न असतील. प्रत्येक प्रश्नात प्रत्येकी ५ गुणाचे पाच उपप्रश्न असतील. प्रत्येक प्रश्नातील पाचपैकी चार उप-प्रश्न सोडवावयाचे असतील. विद्यार्थ्यांना प्रत्येक अभ्यासक्रमात ८० पैकी मिळालेले गुण गुणपत्रिकेत (University Assessment - UA) स्वतंत्रपणे दर्शविण्यात येतील. प्रत्येक अभ्यासक्रमात उत्तीर्ण होण्याकरिता किमान ४०% गुण मिळविणे अनिवार्य असेल.

६.२ द्वितीय वर्ष मूल्यमापन पद्धती

६.२.१ अंतर्गत मूल्यमापन पद्धती

अंतर्गत मूल्यमापनात उत्तीर्ण होण्याकरिता किमान ४०% गुण मिळविणे अनिवार्य असेल. अंतर्गत मूल्यमापनाअंतर्गत २० पैकी मिळालेले गुण गुणपत्रिकेत (Continous Assessment – CA) स्वतंत्रपणे दर्शविण्यात येतील. अंतर्गत मूल्यमापनात मिळालेले गुण अंतिम परीक्षेत मिळालेल्या गुणांसोबत एकत्रितपणे गुणपत्रिकेत दर्शविण्यात येतील. अंतर्गत मूल्यमापन व अंतिम मूल्यमापनात प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे अंतिम निकाल जाहीर करण्यात येईल. विद्यापीठाने अंतर्गत मूल्यमापन सादर करण्याबाबत काही बदल केल्यास त्याबाबतच्या सविस्तर सूचना संकेतस्थळावर तसेच आपल्या अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहायता केंद्रावर दिल्या जातील.

अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहायता केंद्रावरील संमंत्रकांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करावयाच्या प्रात्यक्षिकांचे व कार्यानुभवाचे मूल्यांकन अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहायता केंद्रावरील संमंत्रकांनीच करावयाचे आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे:

द्वितीय वर्ष (सर्वसाधारण क्षेत्रे)

अ. क्र.	अभ्यासक्रम संकेतांक	प्रात्यक्षिक / कार्यानुभवाचे स्वरूप	गुण	श्रेयांक
१.	MCJ201(P)	(i) बातमीदारी: कार्यानुभव / सर्वेक्षण (ii) बातमी संपादन	२५ २५	०१

२.	MCJ202(P)	(iii) बातमी: कात्रणसंग्रह (iv) वृत्तविश्लेषण	२५ २५	०१
३.	MCJ205(P)	(i) वृत्तलेख-लेखन (ii) अग्रलेख / सदर लेखन	२५ २५	०१
४.	MCJ206(P)	(i) नभोवाणीसाठी लेखन (ii) दूरचित्रवाणी / स्वरसाधना सादरीकरण	२५ २५	०१
५.	EVS201	पर्यावरण अभ्यास / गृहपाठ*	२०	-
एकूण			**२००**	**०४**

*पर्यावरण अभ्यास (EVS201) या अनिवार्य अभ्यासक्रमासाठी २० गुणांचा गृहपाठ तर ८० गुणांची लेखी परीक्षा असेल. या अभ्यासक्रमाचे गुण अंतिम श्रेणी ठरविताना ग्राह्य धरले जाणार नाहीत. तथापि यात 'सी' श्रेणी मिळवणे अनिवार्य असेल.

❖ अभ्यासक्रमनिहाय अंतर्गत मूल्यमापन

विद्यार्थ्यांनी गृहपाठ, कार्यपुस्तिका, क्षेत्रीय सर्वेक्षण, कात्रणसंग्रह, पाहणी अहवालांच्या माध्यमातून प्रकल्प पद्धतीने अभ्यास करावयाचा आहे. त्याचे अभ्यासक्रमनिहाय स्वाध्याय व मूल्यमापनाचे तपशील खाली दिलेले आहेत. विद्यार्थ्यांनी अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहायता केंद्रावरील समंत्रकांच्या मार्गदर्शनाखाली हा अभ्यास पूर्ण करून त्यांच्याकडे आपापले प्रकल्प, कार्यपुस्तिका मूल्यमापनासाठी दिलेल्या मुदतीत सादर करावयाचे आहेत. अंतर्गत मूल्यमापनासाठीचे कार्य विद्यार्थ्याने निर्धारित मुदतीत अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहायता केंद्रावर सादर करून संबंधित समंत्रकांकडून गुणदान करून घ्यावे.

(आ) द्वितीय वर्ष (सर्वसाधारण क्षेत्रे)

❖ MCJ201: वृत्तपत्रविद्या व पत्रकारिता (५० गुण)

(क) बातमीदारी : कार्यानुभव / सर्वेक्षण (२५ गुण)

(१) आपल्या परिसरातील खालीलपैकी एका विषयावरील क्षेत्रीय पाहणी करून बातमीपत्रे / वृत्तलेख लिहा.

१. विशिष्ट विकासयोजना (उदाहरणार्थ, पंतप्रधानांची ग्रामसडक योजना, पावसाच्या पाण्याचा पुनर्वापर, पाणीपुरवठा, आरोग्य योजना, कृषी क्षेत्रातील विशिष्ट योजना, साक्षरता मोहीम)
२. ग्रामपंचायत / नगरपालिका / महापालिका यांचे कार्य
३. स्वयंसेवी संस्थेचे कार्य
४. स्थानिक समस्या
५. ग्रामस्वच्छता अभियान/ नगर-स्वच्छता अभियान
६. विकास निधींचा विनियोग (आमदार-खासदारांच्या विकास निधीतील कामे)
७. ग्रामपंचायतीच्या ग्रामसभा
८. जिल्हापरिषदांच्या आमसभा
९. अंगणवाड्यातील शिक्षण
१०. पर्यावरणाची स्थिती
११. व्यसनाधीनता
१२. अंधश्रद्धा व लोकसमजुती
१३. फुलशेती
१४. विज्ञानप्रदर्शने
१५. कुपोषण (कोवळी पानगळ)
१६. कचरा व्यवस्थापन
१७. बचतगट आणि विकासयोजना
१८. वाचनालये
१९. विशिष्ट उद्देशाने स्थापन झालेली मंडळे
२०. वैद्यकीय सेवा आणि रुग्णांचे / वैद्यांचे अनुभव

(ख) बातमी संपादन (२५ गुण)

(१) वृत्तपत्रातून निवडलेल्या कोणत्याही पाच बातम्या तुमच्या दृष्टीने आदर्श स्वरूपात कशा असाव्यात हे ठरवून त्या बातमीचे पुनर्लेखन करा. (टीप : मूळ बातमी चिकटवहीत डाव्या बाजूला चिकटवावी व समोर उजव्या पानावर पुनर्लेखित बातमी लिहावी. एकूण गुण : १००)

(२) एकच बातमी निरनिराळ्या वृत्तपत्रांत कोणकोणत्या पद्धतीने प्रसिद्ध झाली याची तुलनात्मक निरीक्षणे नोंदवा. या उपक्रमासाठी एका घटनेवरील पाच बातम्या याप्रमाणे तीन घटनांच्या एकूण १५ बातम्या संकलित कराव्यात. प्रत्येक घटनेवरील पाचही बातम्या सलग चिकटवाव्यात व नंतर त्याविषयी तौलनिक निरीक्षणांचे टिपण लिहावे. बातमीचे शीर्षक, लीड, आतला मजकूर, माहितीचा तपशील, भाषा इत्यादी अंगांनी हे टिपण लिहावे. (गुण विभागणी : एका टिपणास ५ गुण याप्रमाणे ३ टिपणास १५ गुण)

❖ **MCJ202: बातमीची विविध कार्यक्षेत्रे (५० गुण)**

(क) बातमी : कात्रणसंग्रह (२५ गुण)

कोणत्याही एका कार्यक्षेत्रातील बातम्यांचा संग्रह तयार करा व त्यावर आधारित पुढील स्वाध्याय पूर्ण करा. (२५ गुण)

कृषी, सहकार, अर्थ-वाणिज्य व क्रीडा या कार्यक्षेत्रातील एका विशिष्ट विषयावर एकाहून अधिक वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झालेल्या किंवा एकाच घटनेभोवती केंद्रित झालेल्या सुमारे दहा बातम्यांची कात्रणे काढून ती वहीत चिटकवा.

प्रत्येक बातमीचे मथळा, आशय, मांडणी, भाषा, छायाचित्र, बातमीचा स्त्रोत व स्थान या दृष्टीने निरीक्षण नोंदवा.

(ख) वृत्त विश्लेषण (२५ गुण)

राजकारण, गुन्हेगारी, समाजकारण, विज्ञान, शिक्षण, कला व संस्कृती या क्षेत्रांतील एखाद्या महत्त्वाच्या घटनेपाठोपाठ घडणाऱ्या विविध घडामोडी, त्यावरील भाष्यासह केली जाणारी वृत्तसमीक्षा, अग्रलेख, वाचकपत्रे, व्यंग्यचित्रे यांसह त्या घटनेचे वार्तामूल्य विशद करणारा अहवाल तयार करा. त्यासाठी आवश्यक ती कात्रणे, छायाचित्रे, व्यंग्यचित्रे, रेखाटने यांचे संकलन करून त्याची चिकटवही तयार करा.

❖ **MCJ205: मुद्रित माध्यमांसाठी लेखन कौशल्ये (५० गुण)**

(क) वृत्तलेख — लेखन / भाषांतर (२५ गुण)

खालीलपैकी *कोणत्याही पाच विषयांवर* एकेक वृत्तलेख लिहा.

(१) निवडणूक, (२) स्थानिक राजकारण, (३) खाजगी शिक्षण संस्था, (४) दहशतवाद, (५) भ्रष्टाचार, (६) चित्रपटांतील करमणूक,

(७) विद्यार्थी संघटना, (८) पर्यावरण चळवळी, (९) विधिमंडळातले कामकाज, (१०) वाङ्मयीन घडामोडी.

किंवा

इंग्रजी वृत्तपत्रांतील पुढीलपैकी कोणत्याही पाच विषयांतील एकेक बातमी निवडून तिचे भाषांतर करा.

(क) राजकीय बातमी, (ख) अपघात वृत्त, (ग) क्रीडावार्ता, (घ) अर्थ-व्यापारविषयक बातमी, (च) विज्ञान-तंत्रज्ञान-पर्यावरण विषयक बातमी, (छ) संसद-विधिमंडळाचे कामकाज,(ज) कृषी, सहकार, ग्रामीण विकास, (झ) आंतरराष्ट्रीय घडामोडी किंवा संरक्षण-विषयक बातमी, (ट) कला-साहित्य-करमणूक किंवा लोकरुची वार्तापत्र, (ठ) नैसर्गिक आपत्ती (भूकंप, अवर्षण इत्यादी), (ड) सामाजिक घडामोडी, (ढ) गुन्हे वृत्त.

(ख) अग्रलेख / सदरलेखन / वाचकपत्रे (२५ गुण)

(१) वृत्तपत्रातील राजकीय विषयावरील दहा अग्रलेखांचे सर्वेक्षण करा. राजकीय प्रश्नांची निवड, अग्रलेखकांचा दृष्टिकोन, प्रश्नांची मांडणी, निरुपणशैली, इत्यादी अंगांनी या अग्रलेखांबाबतचे आपले आकलन नोंदवा.

किंवा

(२) कोणत्याही एका वृत्तपत्रातील सदराची दहा कात्रणे काढा. त्यावर आधारित आपले आकलन स्पष्ट करणारा १००० शब्दांचा निबंध लिहा. सदर लेखकाने निवडलेले विषय व त्यांचे महत्त्व, विषयमांडणी व निरुपणशैली, गुणवैशिष्ट्ये व त्रुटी यांसह ही समीक्षा असावी.

किंवा

(३) वृत्तपत्रांतील वाचकपत्रांचे सर्वेक्षण (किमान २५ पत्रे निवडावीत)

सर्वेक्षणात पत्रांचे विषय, ठिकाण, पत्रलेखकांचा सामाजिक स्तर, पत्रलेखनाची भाषा, विषय मांडणीची पद्धती, पत्रलेखकास मिळालेला प्रतिसाद, पत्रविषयाला मिळालेला प्रतिसाद, वाचकपत्रांचे वर्गीकरण (उदाहरणार्थ - वादविषय, दादफिर्याद, कैफियत, मतप्रकटीकरण, लक्ष्यवेध, अनुभवकथन) इत्यादी अंगांनी सर्वेक्षण अहवाल लिहावा.

❖ **MCJ206: दृक्-श्राव्य माध्यमे: स्वरूप व कौशल्ये (५० गुण)**

(क) नभोवाणीसाठी लेखन (२५ गुण)

(१) खालीलपैकी एका कार्यक्रमाची २० मिनिटांच्या प्रसारणासाठी संहिता तयार करा. (२५ गुण)

१. अंधश्रद्धा निर्मूलन या विषयावर संवादात्मक कार्यक्रम.

२. कुटुंबातील ताण-तणाव या विषयावर श्रुतिका.

३. 'पाण्याचा प्रश्न' या विषयावर रूपक.

४. ग्रामस्वच्छता अभियान, पल्स पोलिओ मोहीम किंवा तत्सम स्वरूपाच्या दोन विषयांवर प्रत्येकी दहा मिनिटांचे भाषण.

(ख) दूरचित्रवाणी / स्वरसाधना सादरीकरण (२५ गुण)

अभ्यासकेंद्रावर संमंत्रक दूरचित्रवाणी / स्वरसाधना यांबाबत वेळोवेळी प्रात्यक्षिके करवून घेतील. त्या प्रात्यक्षिकांची टिपणवही विद्यार्थ्यांनी ठेवावी. संमंत्रक विद्यार्थ्यांच्या या कौशल्य संपादनाच्या प्रगतीचे मूल्यांकन करतील व त्यास २५ पैकी गुण देतील.

❖ **EVS201: पर्यावरण अभ्यास**

अंतर्गत मूल्यमापन : २० गुणांचा गृहपाठ.

अंतिम मूल्यमापन : ८० गुणांची अंतिम परीक्षा

६.२.२ अंतिम मूल्यमापन पद्धती

- अंतिम परीक्षा साधारणतः मे महिन्यात असेल. प्रत्येक वर्षाच्या सहा अभ्यासक्रमांसाठी ६ प्रश्नपत्रिका असतील. प्रती अभ्यासक्रम ८० गुणांची ३ तास वेळ असणारी अंतिम परीक्षा असेल. प्रत्येक प्रश्नपत्रिकेत २० गुणांचे चार प्रश्न असतील. प्रत्येक प्रश्नात प्रत्येकी ५ गुणाचे पाच उपप्रश्न असतील. प्रत्येक प्रश्नातील पाचपैकी चार उप-प्रश्न सोडवावयाचे असतील. विद्यार्थ्यांना प्रत्येक अभ्यासक्रमात ८० पैकी मिळालेले गुण गुणपत्रिकेत (University Assessment - UA) स्वतंत्रपणे दर्शविण्यात येतील. प्रत्येक अभ्यासक्रमात उत्तीर्ण होण्याकरिता किमान ४०% गुण मिळविणे अनिवार्य असेल.
- पर्यावरण अभ्यास (EVS 201) या अनिवार्य अभ्यासक्रमाची परीक्षा विद्यार्थ्यांना द्यावी लागेल. या अभ्यासक्रमासाठी ८० गुणांसाठी अंतिम परीक्षा असेल तर २० गुण हे गृहपाठासाठी असतील. मात्र या अभ्यासक्रमाचे गुण शिक्षणक्रमाची अंतिम श्रेणी ठरविताना ग्राह्य धरले जाणार नाहीत.

६.३ तृतीय वर्ष मूल्यमापन पद्धती

६.३.१ अंतर्गत मूल्यमापन पद्धती

अंतर्गत मूल्यमापनात उत्तीर्ण होण्याकरिता किमान ४०% गुण मिळविणे अनिवार्य असेल. अंतर्गत मूल्यमापनाअंतर्गत २० पैकी मिळालेले गुण गुणपत्रिकेत (Continous Assessment – CA) स्वतंत्रपणे दर्शविण्यात येतील. अंतर्गत मूल्यमापनात मिळालेले गुण अंतिम परीक्षेत मिळालेल्या गुणांसोबत एकत्रितपणे गुणपत्रिकेत दर्शविण्यात येतील. अंतर्गत मूल्यमापन व अंतिम मूल्यमापनात प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे अंतिम निकाल जाहीर करण्यात येईल. विद्यापीठाने अंतर्गत मूल्यमापन सादर करण्याबाबत काही बदल केल्यास त्याबाबतच्या सविस्तर सूचना संकेतस्थळावर तसेच आपल्या अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहायता केंद्रावर दिल्या जातील.

अभ्यासकेंद्र/ विद्यार्थी सहायता केंद्रावरील संमंत्रकांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करावयाच्या प्रात्यक्षिकांचे व कार्यानुभवाचे मूल्यांकन अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहायता केंद्रावरील संमंत्रकांनीच करावयाचे आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे:

तृतीय वर्ष (विशेष क्षेत्रे)

अ. क्र.	अभ्यासक्रम संकेतांक	प्रात्यक्षिक / कार्यानुभवाचे स्वरूप	गुण	श्रेयांक
१.	MCJ304(P)	(i) जाहिरात संग्रह व विश्लेषण	५०	०२

		(ii) छायाचित्रण / गृहपत्रिका संपादन	५०	
२.	MCJ305(P)	(iii) वृत्तपत्र / नियतकालिक/ ग्रंथ संपादन	५०	०१
३.	MCJ306(P)	(iv) संगणकीय उपयोजन	५०	०१
एकूण			**२००**	**०४**

❖ अभ्यासक्रमनिहाय अंतर्गत मूल्यमापन

विद्यार्थ्यांनी गृहपाठ, कार्यपुस्तिका, क्षेत्रीय सर्वेक्षण, कात्रणसंग्रह, पाहणी अहवालांच्या माध्यमातून प्रकल्प पद्धतीने अभ्यास करावयाचा आहे. त्याचे अभ्यासक्रमनिहाय स्वाध्याय व मूल्यमापनाचे तपशील खाली दिलेले आहेत. विद्यार्थ्यांनी अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहायता केंद्रावरील समंत्रकांच्या मार्गदर्शनाखाली हा अभ्यास पूर्ण करून त्यांच्याकडे आपापले प्रकल्प, कार्यपुस्तिका मूल्यमापनासाठी दिलेल्या मुदतीत सादर करावयाचे आहेत. अंतर्गत मूल्यमापनासाठीचे कार्य विद्यार्थ्याने निर्धारित मुदतीत अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहायता केंद्रावर सादर करून संबंधित समंत्रकांकडून गुणदान करून घ्यावे.

(इ) तृतीय वर्ष (विशेष अभ्यासक्षेत्रे)

❖ MCJ304: पत्रकारिता आणि संबंधित कार्यक्षेत्रे (१०० गुण)

(क) जाहिरातसंग्रह व विश्लेषण (५० गुण)

कोणतेही एक उत्पादनक्षेत्र निवडा (उदाहरणार्थ, 'मोबाईल'कंपन्या) आणि त्या क्षेत्रातील जाहिरातींचा संग्रह करा. या संग्रहावर आधारित विश्लेषण अहवाल तयार करा. त्यात जाहिरातीसाठी निवडलेली माध्यमे, जाहिरातींचे प्रकार, भाषिक व चित्रात्मक शैली, ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी उपयोजिलेली कौशल्ये, बरोबरीच्या स्पर्धकांवर मात करण्यासाठी कल्पकतेचा वापर आणि व्यापारी चढाओढीतल्या स्थानात जाहिरातींचा वाटा अशा मुद्यांचा समावेश असावा.

(ख) छायाचित्रण / गृहपत्रिका संपादन (५० गुण)

(१) छायाचित्र-पत्रकारितेच्या संदर्भातील खालीलपैकी एक अभ्यासप्रकल्प पूर्ण करा. (२५ गुण)

(क) स्वत: काढलेल्या छायाचित्रांवर आधारलेली पाच बातमीपत्रे तयार करा.

(ख) एखाद्या विशिष्ट विषयावर क्षेत्रीय छायाचित्रण करून 'छायाचित्रांवर आधारित वृत्तलेख' लिहा.

(ग) तुम्हांला आवडलेल्या कोणत्याही एका छायाचित्र पत्रकारावर त्याच्या छायाचित्रीकरणाच्या नमुन्यांसह परिचयपर लेख लिहा.

(घ) दंगली/ पूर / दुष्काळ किंवा तत्सम आपत्कालीन प्रसंगांवर आधारित छायाचित्रांकित बातम्या / वृत्तलेख यांचा कात्रणसंग्रह तयार करा व त्याचा निरीक्षण अहवाल लिहा.

(२) पुढीलपैकी एक कार्य पूर्ण करा. (२५ गुण)

(क) विशिष्ट संस्था वा उद्योगातील जनसंपर्क विभागाच्या कार्याची माहिती संकलित करून ७५० ते १००० शब्दांत अहवाललेखन करा. अहवालासोबत संबंधित संस्था / उद्योगाची माहितीपत्रके, घडीपत्रिका, स्मरणिका, इत्यादी पूरक प्रसिद्धी साहित्यही जोडावे.

(ख) जिल्हा किंवा विभागीय माहिती कार्यालय अथवा विशिष्टसंस्था /उद्योग यांनी प्रकाशित केलेले प्रसिद्धी साहित्य संकलित करून त्यासंबंधीचा निरीक्षण अहवाल लिहा. (शब्दमर्यादा ७५० ते १००० शब्द)

(ग) एखाद्या शैक्षणिक संस्थेस, स्वयंसेवी संस्थेस अथवा सांस्कृतिक मंडळास भेट देऊन त्याच्या कार्याची माहिती मिळवा व त्यासंदर्भात त्या संस्थेचे माहितीपत्रक / घडीपत्रिका हस्तलिखित स्वरूपात तयार करा. माहितीसंकलन, त्याचे सादरीकरण, मांडणी, सजावट, संज्ञापनक्षमता इत्यादींच्या अंगांनी सदर घडीपत्रिकेचे मूल्यांकन केले जाईल.

(घ) कोणत्याही पाच गृहपत्रिका मिळवा आणि त्यांच्या संपादनाची विविध अंगांनी चिकित्सा करणारा अहवाल तयार करा.

❖ MCJ305: संपादन: स्वरूप व कौशल्ये (५० गुण)

(क) नमुना वृत्तपत्र संपादन (सांघिक कृती प्रकल्प): ४ पृष्ठांचे दैनिक संपादित करणे. (५० गुण)

१. विशिष्ट दिवस निवडून वृत्तपत्राची कचेरी स्थापन करा.

२. वृत्तपत्रीय कामकाजातील घटक लक्षात घेऊन संपादक, उपसंपादक, वार्ताक्षेत्रानुसार बातमीदार, मुद्रितशोधक, छायाचित्रकार, भाषांतरकार, लेआऊट-डिझायनर अशा विविध कामांची वाटणी करा.

३. नियुक्त बातमीदारांनी आपापल्या कार्यक्षेत्रातील बातम्या लिहून त्या फोनने, ई-मेलने किंवा इतर वेब (web), समाज माध्यमांच्या सहाय्याने कचेरीत पाठवाव्यात. कचेरीतील उपसंपादकांनी त्या संपादित करून प्रेस कॉपी करावी.

४. याखेरीज नभोवाणी, दूरचित्रवाणी इत्यादी माध्यमांतून मिळणाऱ्या बातम्या संपादित कराव्यात.
५. दिवसभरातल्या घडामोडींवर आधारित अग्रलेख व एक स्फुट लिहावे.
६. दोन वाचकपत्रे लिहावीत.
७. संकलित व संपादित मजकुराचे डी.टी.पी. करून पृष्ठमांडणी करावी.
८. रात्री, नभोवाणी, दूरचित्रवाणी किंवा इतर वेब मध्यमांवर प्रसारित होणारी बातमीपत्रे ऐकून ताज्या बातम्यांचा अंतर्भाव करून दैनिकाचा मजकूर अद्ययावत करावा.
९. व्यंगचित्रे, छायाचित्रे, हवामान, स्थानिक कार्यक्रम, इत्यादी आनुषंगिक मजकूर घालून ४ पृष्ठांच्या मर्यादेत वृत्तपत्र शक्य तितके परिपूर्ण करावे. वृत्तपत्रांचे नाव ठरविण्याचे स्वातंत्र्य अभ्यासकेंद्रास राहील.
१०. रात्री दहा वाजेपर्यंत वृत्तपत्र प्रसिद्ध करावे. (प्रती १००)
११. सकाळी बस-स्थानकावर २५ प्रती विक्रीस ठेवाव्यात. प्रत्येक विद्यार्थ्यास, समंत्रकास, गावातील प्रमुख व्यक्तींना नमुना अंक द्यावा. तीन प्रती मुक्त विद्यापीठाच्या मुख्य कार्यालयात संचालक, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा; संचालक, विद्यार्थी सेवा विभाग; संचालक, मूल्यमापन विभाग यांना पाठवाव्यात.
१२. दुसऱ्या दिवशी इतर प्रसिद्ध वर्तमानपत्रे पाहून व स्थानिक वाचकांचे प्रतिसाद लक्षात घेऊन आपण प्रसिद्ध केलेल्या दैनिकांची सर्वांगीण चिकित्सा करावी व त्या चर्चेचा अहवाल तयार करावा.
१३. समंत्रकांनी सदर कृति-कार्यक्रम आपल्या देखरेखीखाली पूर्ण करावा. विद्यार्थ्यांच्या कौशल्यांची व उपक्रमशीलतेची नोंद ठेवून त्यानुसार प्रत्येकास ५० पैकी गुण द्यावेत. या कृतिप्रकल्पात प्रत्येक विद्यार्थ्यास विशिष्ट कौशल्य सिद्ध करण्यास वाव देणारे काम देण्यात यावे.

किंवा

(ख) अभ्यासप्रकल्प: खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर चालू वर्षभरातील प्रकाशनांच्या आधारे अभ्यासप्रकल्प सादर करा (५० गुण)

१. मराठीतील दिवाळी अंक
२. विज्ञान प्रसाराची नियतकालिके
३. मुलांची मासिके
४. कृषिविषयक नियतकालिके
५. वैचारिक नियतकालिके

या प्रकल्प अहवालात विषयांची निवड व त्यांचे महत्त्व, मांडणी व सजावट, लेखक-संपादकांचे दृष्टिकोन, लेखनशैली, ग्राहक संख्या, जाहिराती, इत्यादी अंगांनी संपादनाची निरीक्षणे नोंदवावीत. किंवा

विद्यार्थ्यांनी स्वत:चे नियतकालिक / ग्रंथ प्रकाशित केल्यास ते आवृत्ती तयार करा. प्रकाशन त्यासंबंधीच्या संपादन अनुभवाच्या टिपणासह सादर करावे.

✤MCJ306: प्रसारमाध्यमांतील संगणकीय उपयोजन व मुद्रणतंत्रे (५० गुण)

खालीलपैकी कोणताही **एक** उपक्रम पूर्ण करून त्याची 'डिजिटल' आवृत्ती तयार करा.

१. स्वत:ची ऑफलाइन वेबसाइट डिझाइन करा. त्यावर तुम्ही एक न्यूजलेटर प्रसिद्ध करा.
२. 'वेब-ब्लॉग' च्या माध्यमातून पाच वार्तापत्रे प्रसिद्ध करा.
३. आठ पानांची एक गृहपत्रिका / साप्ताहिक / माहितीपुस्तिका 'डिजिटल' अथवा 'मुद्रित' माध्यमात तयार करा. या प्रकाशनात आरेखन, मांडणी, रंगसंगती, टंकांची विविधता, चित्र-छायाचित्रे यांचा वापर करा. मुखपृष्ठ, मलपृष्ठ, अनुक्रमणिका, हेडर, फुटर, मार्जिन, कॉलम साईज, संगणकीय शुद्धलेखन तपासणी, इत्यादी जी संगणकीय-मुद्रण कौशल्ये आपण शिकलात त्याचे उपयोजन करा. अंकाच्या / ग्रंथाच्या प्रास्ताविकात या प्रकाशनाच्या प्रसिद्धीतले आपले अनुभव नोंदवा.
४. एका विशिष्ट घटनेवर इंटरनेटच्या माध्यमांतून वार्तापत्रे, वृत्तविश्लेषण, अग्रलेख, छायाचित्रे शोधून त्यांच्या साहाय्याने एक समग्र कव्हर स्टोरी तयार करा.

६.३.२ अंतिम मूल्यमापन पद्धती

अंतिम परीक्षा साधारणतः मे महिन्यात असेल. प्रत्येक वर्षाच्या सहा अभ्यासक्रमांसाठी ६ प्रश्नपत्रिका असतील. प्रती अभ्यासक्रम ८० गुणांची ३ तास वेळ असणारी अंतिम परीक्षा असेल. प्रत्येक प्रश्नपत्रिकेत २० गुणांचे चार प्रश्न असतील. प्रत्येक प्रश्नात प्रत्येकी ५ गुणाचे पाच उपप्रश्न असतील. प्रत्येक प्रश्नातील पाचपैकी चार उप-प्रश्न सोडवावयाचे असतील. विद्यार्थ्यांना प्रत्येक अभ्यासक्रमात ८० पैकी मिळालेले गुण गुणपत्रिकेत (University Assessment - UA) स्वतंत्रपणे दर्शविण्यात येतील. प्रत्येक अभ्यासक्रमात उत्तीर्ण होण्याकरिता किमान ४०% गुण मिळविणे अनिवार्य असेल.

❖ उत्तीर्णतेचे नियम

(अ) प्रत्येक वर्षाचे स्वतंत्र गुणपत्रक देण्यात येईल. मात्र पदवी परीक्षेचा निकाल फक्त दुसऱ्या व तिसऱ्या वर्षातील गुणांच्या आधारेच घोषित करण्यात येईल.

(आ) अंतर्गत मूल्यमापन व अंतिम परीक्षेचे गुण गुणपत्रिकेत स्वतंत्रपणे दाखविण्यात येतील. टक्केवारी काढताना दोन्ही गटांतील गुण संयुक्तपणे विचारात घेतले जातील.

(इ) संपूर्ण शिक्षणक्रमाची टक्केवारी तिसऱ्या वर्षाच्या गुणपत्रकातच नोंदवली जाईल.

(ई) कृपांक गुण (**Grace Marks**) व इतर गुणसवलतीचे नियम विद्यापीठाचे 'परीक्षा मंडळ' ठरवील ते याही शिक्षणक्रमास लागू राहतील.

❖ विद्यार्थी आणि अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहाय्यता केंद्रे यांना काही तांत्रिक अडचण उद्भवल्यास अथवा अधिक माहितीसाठी ८०५५२५३०७२ या भ्रमणध्वनीवर तसेच oasishelpdesk22@gmail.com या ईमेलवर आपण संपर्क करू शकता.

७. नोंदणी प्रक्रिया

१. विद्यापीठाच्या धोरणात्मक निर्णयानुसार प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने होईल. प्रथमतः आपण https://ycmou.digitaluniversity.ac या विद्यापीठ संकेतस्थळाला भेट द्यावी.

२. विद्यापीठाच्या https://ycmou.digitaluniversity.ac या संकेतस्थळावरील Admission या टॅबवर जाऊन शैक्षणिक सत्र जानेवारी - २०२५ माहितीपुस्तिका (Prospectus) या लिंकवर क्लिक करावे. विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमांच्या माहितीपुस्तिका येथे उपलब्ध आहेत. आपल्याला प्रवेश घ्यायचा असलेल्या शिक्षणक्रमाची माहितीपुस्तिका डाउनलोड करून घ्यावी. शिक्षणक्रमाच्या प्रवेशासंबंधी (उदा. प्रवेश पात्रता, शुल्क, विषय-अभ्यासक्रम इत्यादी) माहिती वाचून आवश्यक असलेल्या पृष्ठांची प्रिंट काढून घ्यावी.

३. विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून ऑनलाईन प्रवेश करताना शिक्षणक्रमनिहाय अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहाय्यता केंद्रांची यादी उपलब्ध होईल. सदर यादीतून आपल्याला प्रवेश घ्यायचा असलेले अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहाय्यता केंद्र निवडावे तसेच त्या अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहाय्यता केंद्रांची संपूर्ण पत्ता व अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहाय्यता केंद्र संकेतांक नोंदवून ठेवावा.

४. माहितीपुस्तिकेत नमूद केल्याप्रमाणे प्रवेश पात्रतेसाठी आवश्यक कागदपत्रे, फोटो आणि स्वाक्षरी JPG/JPEG/PNG या Format मध्ये स्कॅन करून घ्यावी. प्रत्येक फाईलची साईज 10 MB पेक्षा कमी असावी.

५. ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्यापूर्वी विद्यापीठ संकेतस्थळावरील Presentations > User Guide Presentation > Students या तक्त्यातील Online Admission मध्ये दिलेली माहिती पहावी.

६. नव्याने प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेश घेण्यापूर्वी विद्यापीठाच्या Online Admission या लिंकवर जाऊन स्वतःचा सक्रीय ई-मेल आणि मोबाइल क्रमांक नोंदवून USER ID आणि पासवर्ड तयार करणे आवश्यक आहे. आपला USER ID आणि One Time Password (OTP) येथे नोंदवलेल्या मोबाईल क्रमांक आणि ई-मेलवर मिळेल. त्याच्या सहाय्याने नवीन पासवर्ड तयार करा व पुन्हा लॉगीन करून प्रवेश अर्ज भरा.

७. विद्यापीठाच्या यापूर्वीच्या विद्यार्थ्यांनी लॉगीन करण्यासाठी आपला कायम नोंदणी क्रमांक (PRN) आणि मागील वर्षी वापरलेला Password वापरावा. Password आठवत नसल्यास 'Forgot Password' लिंकचा वापर करून त्यात विचारलेली माहिती भरून पुढील ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी.

८. ऑनलाईन प्रवेश करताना विचारलेली सर्व माहिती काळजीपूर्वक भरावी. प्रवेश पात्रतेसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे, फोटो, स्वाक्षरी इत्यादी स्कॅन करून अपलोड करावीत. अर्धवट, अपूर्ण, चूकीची, अथवा अस्पष्ट (blur) असलेली कागदपत्रे अपलोड करू नयेत.

९. आपण प्रवेश घेत असलेल्या शिक्षणक्रमाचे प्रवेश शुल्क माहितीपुस्तिकेत नमूद केल्याप्रमाणे भरणे अनिवार्य आहे. ऑनलाईन प्रवेश अर्जात दिलेल्या लिंकवरून ऑनलाइन पेमेंट गेटवे वापरून क्रेडिट कार्ड / डेबिट कार्ड / नेट बँकिंग / युपीआयद्वारे प्रवेश शुल्क भरावे. प्रवेश अर्जात दिलेल्या लिंक व्यतिरिक्त इतर कुठल्याही लिंकवर शुल्क भरले जाणार नाही याची सर्वस्वी जबाबदारी अर्जदाराची राहील.

१०. प्रवेश निश्चित झाल्याबाबतची माहिती देणारे तसेच इतर माहिती देणारे ई-मेल/ एसएमएस मेसेजेस आपल्या ई-मेल आयडी आणि मोबाईलवर पाठविण्यात येतात. आपल्याला आलेले मेसेजेस जतन करून ठेवावेत.

११. आपण User ID आणि Password वापरून आपल्या प्रवेशाची सद्यस्थिती (Status) पाहू शकता. आपला अर्ज मान्य झालेला असल्यास Approved असा आणि अमान्य झालेला असल्यास Reject असा शेरा आपल्या प्रोफाईलमध्ये दिसेल. आपल्या अर्जाबाबतची स्थिती वेळोवेळी तपासावी.

१२. आपला प्रवेश रद्द झाल्याबाबतचा किंवा कागदपत्रे अपूर्ण असल्याबाबत कोणताही ई-मेल / मेसेज विद्यापीठाकडून पाठवला जात नाही. चूकीचा प्रवेश झाल्यास अथवा प्रवेशास अपात्र ठरल्यास विद्यापीठ नियमानुसार शुल्क परतावा मिळणार नाही.

१३. शिक्षणक्रम यशस्वीरित्या पूर्ण होईपर्यंत अर्जदारास ऑनलाईन प्रवेश अर्जातील माहिती बदलता येणार नाही.

१४. आपला प्रवेश कायम होण्यासाठी ऑनलाईन प्रवेश अर्जाची प्रिंट आणि पात्रतेसंबंधीची कागदपत्रे अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहाय्यता केंद्रावर जमा करावीत. विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध अध्ययन साहित्याचा वापर करावा.

१५. राखीव प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्तीबाबतचे सूचनापत्र संकेतस्थळावर दिलेले आहे. त्याचे काळजीपूर्वक वाचन करून ऑनलाईन प्रवेशाची आणि शिष्यवृत्तीसंबंधीच्या ऑनलाईन अर्जाची समाजकल्याण विभागाच्या संकेतस्थळावर वेळेत कार्यवाही पूर्ण करावी.

१६. विद्यार्थ्यांचे ऑनलाईन ओळखपत्र अभ्यासकेंद्र / विद्यार्थी डाउनलोड करून प्रिंट करू शकतात.

१७. संबंधित शैक्षणिक वर्षाच्या माहितीपुस्तिकेतील प्रवेशासंबंधीचे सर्व नियम, अटी व शर्ती आणि हमीपत्राद्वारे दिलेल्या माहितीचे तसेच विद्यापीठाने वेळोवेळी केलेल्या सूचना व नियमांचे पालन करणे अर्जदारास बंधनकारक असेल.

१८. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार विद्यार्थ्याने कोणत्याही कारणास्तव प्रवेश रद्द केल्यास शिक्षणक्रम शुल्कातून लागू असलेल्या प्रक्रिया शुल्काची कपात करण्यात येईल.

१९. विद्यापीठाने विद्यार्थी विमा योजना लागू केली असून यासंबंधी दावा (claim) करण्यासाठी विभागीय केंद्रामार्फत विद्यार्थी कल्याण व बहि:शाल केंद्राकडे लेखी पत्राद्वारे कळवावे. यासंदर्भात वेळोवेळी होणारे बदल संबंधितांना लागू असतील.

८. शिष्यवृत्ती योजना लागू असलेले विद्यापीठाचे शिक्षणक्रम

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठात अनुसूचित जाती (SC), अनुसूचित जमाती (ST), इतर मागासवर्ग (OBC), विमुक्त जाती/ भटक्या जमाती (VJ/ NT), विशेष मागास प्रवर्ग (SBC) व आर्थिक दुर्बल घटक (EWS) प्रवर्गातील/ घटकांतील विद्यार्थ्यांना शासनाच्या (Post Matric Scholarship Schemes) शिष्यवृत्ती योजना लागू आहेत. विद्यापीठ संकेतस्थळावर शिष्यवृत्तीबाबतचे सूचनापत्र दिलेले आहे. विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भरताना सदर सुचनापत्राचे काळजीपूर्वक वाचन करून योग्य त्या शिष्यवृत्ती पर्यायाची निवड करावी. असा पर्याय निवडून विद्यापीठाच्या खालीलपैकी शिक्षणक्रमाला ऑनलाईन प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी महाडीबीटीच्या संकेतस्थळावरून शिष्यवृत्तीसंबंधीच्या ऑनलाईन अर्जाची कार्यवाही विहित मुदतीत पूर्ण करणे अनिवार्य आहे. शिष्यवृत्ती योजना लागू असलेल्या शिक्षणक्रमांची यादी पुढीलप्रमाणे.

अ.क्र.	शिष्यवृत्ती योजना लागू असलेले विद्यापीठातील शिक्षणक्रम	शिक्षणक्रम कालावधी
१.	बी. ए. मराठी आणि उर्दू माध्यम	३ वर्षे
२.	बी. ए. जनसंज्ञापन आणि वृत्तपत्रविद्या	३ वर्षे
३.	एम. ए. मराठी	२ वर्षे
४.	एम. ए. हिंदी	२ वर्षे

५.	एम. ए. उर्दू	२ वर्षे
६.	एम. ए. इतिहास	२ वर्षे
७.	एम. ए. अर्थशास्त्र	२ वर्षे
८.	एम. ए. लोकप्रशासन	२ वर्षे
९.	ग्रंथालय व माहितीशास्त्र पदवी शिक्षणक्रम	१ वर्षे
१०.	ग्रंथालय व माहितीशास्त्र निष्णात शिक्षणक्रम	१ वर्षे

९. ABC-ID/ APAAR-ID आणि DEB-ID तयार करण्याविषयीची सूचना

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण, २०२० नुसार विद्यार्थ्यांस शिक्षणक्रम प्रवेशाच्यावेळी Academic Bank of Credits (ABC-ID)/ Automated Permanent Academic Account Registry (APAAR) - ID तयार करणे अनिवार्य आहे. ABC-ID हाच आता APAAR-ID असून आपण यापूर्वी प्राप्त केलेल्या प्रमाणपत्र, पदविका, पदवीची माहिती Digi-Locker (ABC-NAD) वर भरावी लागणार आहे. त्याशिवाय इतर अभ्यासक्रमांचे श्रेयांकांतर (क्रेडीट ट्रान्सफर) करता येणार नाही. ABC-ID/ APAAR-ID तयार करण्याकरिता https://www.abc.gov.in किंवा https://apaar.education.gov.in/ या पोर्टलवर नोंदणी करावी अथवा विद्यापीठाच्या www.ycmou.ac.in संकेतस्थळाला भेट द्यावी. विद्यापीठ संकेतस्थळावरील Student Zone या लिंकवर क्लिक करावे. यादीतील Academic Bank of Credits यावर क्लिक करून ABC-ID/ APAAR-ID तयार करण्यासंबंधीचे सादरीकरण पाहावे आणि त्यानुसार कार्यवाही करावी. मुक्त शिक्षण प्रणालीतील विद्यार्थ्यांना APAAR-ID सोबतच DEB-ID तयार करणे आवश्यक आहे. https://deb.ugc.ac.in/StudentDEBId या लिंकवरून DEB-ID तयार करता येईल.

१०. विशेष सूचना/ संपर्कासाठी

अ) प्रवेश-अर्ज भरण्यासंबंधीच्या सूचना

१. प्रवेश-अर्ज भरण्यापूर्वी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेली शिक्षणक्रमाची माहितीपुस्तिका वाचावी.
२. विद्यार्थ्याने प्रवेश घेण्यापूर्वी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर नोंदणी करून आपली प्रोफाईल तयार करणे आवश्यक आहे. यासाठी स्वतःचा मोबाईल क्रमांक (शक्यतो व्हॉट्सॲप) आणि सक्रीय असलेला इमेल आयडी नोंदवावा.
३. प्रवेश अर्ज आपण स्वतः भरणे, फोटो आणि स्वाक्षरी स्वतः अपलोड करणे किंवा समक्ष करून घेणे आवश्यक आहे. याबाबत माहितीपुस्तिकेत तसेच विद्यापीठ संकेतस्थळावर दिलेली माहिती वाचावी. (१. वेबसाईट — Presentations २. Registration Page Link)
४. ऑनलाईन प्रवेश-अर्ज भरताना शाळा सोडल्याच्या दाखल्याची प्रत (Leaving Certificate) तसेच शेवटच्या शैक्षणिक पात्रतेबाबत गुणपत्रकांच्या प्रती (Marksheets) अपलोड करणे आवश्यक आहे.
५. प्रवेश अर्जातील माहिती काळजीपूर्वक भरावी. एकदा Submit केलेल्या अर्जात नंतर बदल करता येणार नाही.

आ) अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहाय्यता केंद्रासंबंधीच्या सूचना

१. प्रवेशाची मुदत संपल्यानंतर संपर्कसत्रे केव्हा सुरू करण्यात येतील, त्यासंबंधी अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहाय्यता केंद्रावर जाऊन वेळापत्रक पाहावे. ओळखपत्रावर अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहाय्यता केंद्र प्रमुखांची स्वाक्षरी व शिक्का घ्यावा. अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहाय्यता केंद्रात येताना व परीक्षेच्या वेळी ओळखपत्र सोबत असणे आवश्यक आहे.
२. विद्यापीठाने स्थापन केलेल्या अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहाय्यता केंद्राव्यतिरिक्त अन्य कोणत्याही खाजगी संस्था किंवा शिकवणी वर्गांना (क्लास) विद्यापीठाची मान्यता नाही, अशा संस्थेत किंवा 'क्लास' मध्ये प्रवेश घेतल्यास किंवा जादा शुल्क भरल्यास त्यासाठी विद्यापीठ जबाबदार असणार नाही.
३. विद्यापीठाने निर्धारित केलेल्या अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहाय्यता केंद्रावर अंतिम परीक्षा घेण्यात येते, त्यात बदल होणार नाही.

४. अंतर्गत मूल्यमापनासाठी गृहपाठाचे प्रश्न विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिले जातात. सदर गृहपाठ पूर्ण करून विद्यार्थी सहायता केंद्रावर विहित वेळेत जमा करावे. याबाबत अधिक माहितीसाठी संबंधित अभ्यासक्रमाच्या समंत्रक-प्राध्यापकांकडून मार्गदर्शन घ्यावे.

५. अभ्यासकेंद्र/ विद्यार्थी सहाय्यता केंद्रावर पुरेशी विद्यार्थी नोंदणी झालेली नसल्यास अशा केंद्रावरील विद्यार्थ्यांना जवळच्या केंद्रावर संपर्कसत्र व परीक्षेस वर्ग (Transfer) करण्यात येईल.

६. **अत्यंत महत्त्वाचे:** प्रथम वर्षाला ज्या नावाने प्रवेश घेतलेला आहे, त्याच नावाने पदवी प्रमाणपत्र मिळेल. त्यात बदल होणार नाही याची नोंद घ्यावी. नावात बदल असल्यास राजपत्राची प्रत अनिवार्य आहे.

७. विद्यापीठाकडून मिळालेले गुणपत्रक तसेच पदवी प्रमाणपत्र गहाळ झाल्यास विद्यापीठ नियमानुसार निर्धारित शुल्क रुपये ६००/- (रुपये सहाशे) भरून दुय्यम प्रतीची मागणी करता येईल. तसेच त्याकरिता रु. १०० च्या बॉण्ड पेपरवर स्वयंघोषित प्रतिज्ञापत्र (Affidavit) सादर करणे आवश्यक असेल.

८. विद्यार्थ्यांनी प्रवेश, गृहपाठ, परीक्षा, पुनर्परीक्षा इत्यादीबाबत सविस्तर माहिती मिळवण्यासाठी विद्यापीठाच्या संकेतस्थळाला वेळोवेळी भेट द्यावी. अभ्यासकेंद्र / सहाय्यता केंद्राशी सतत संपर्क ठेवणे आपल्या हिताचे आहे.

इ) विद्यापीठाचे मुख्यालय

'ज्ञानगंगोत्री परिसर', गोवर्धन, गंगापूर धरणाजवळ, नाशिक – ४२२ २२२
दूरध्वनी क्र. (०२५३) २२३१७१४, २२३१७१५, २२३०२२७

■ विद्यापीठ व विभागीय केंद्र यांच्या कार्यालयीन वेळा पुढीलप्रमाणे आहेत.

- सकाळी १०.०० ते सायंकाळी ५.४५ (दुपारी १.३० ते २.०० सुट्टी)
- रविवार, प्रत्येक महिन्याचा पहिला व तिसरा शनिवार तसेच शासकीय सुट्टीच्या दिवशी वरील कार्यालये बंद राहतील.

■ विशेष अडचणींबाबत संपर्क

१. माहितीपुस्तिका, प्रवेश अर्ज, अभ्यासकेंद्र / विद्यार्थी सहाय्यता केंद्र

- ❖ संचालक, विद्यार्थी सेवा विभाग, नाशिक
- ❖ नोंदणी प्रमुख, नोंदणी कक्ष, नाशिक
- ❖ विभागीय संचालक, संबंधित विभागीय केंद्र

२. अभ्यासक्रम (विषय)

- संचालक, मानव्यविद्या व सामाजिकशास्त्रे विद्याशाखा
  दूरध्वनी (०२५३) २२३१४७५ ई-मेल: dir_shu@ycmou.digitaluniversity.ac

३. नोंदणी, नोंदणी क्रमांक, पत्ताबदल, अभ्यासकेंद्र बदल

- **नोंदणी प्रमुख, नोंदणी कक्ष, नाशिक**
  दूरध्वनी (०२५३) २२३०५८० ई-मेल: nondani@ycmou.digitaluniversity.ac

४. परीक्षा, परीक्षा अर्ज, परीक्षा क्रमांक, निकाल, पदवी प्रमाणपत्र इत्यादी

- परीक्षा नियंत्रक, परीक्षा विभाग
  दूरध्वनी (०२५३) २२३०७१६ ई-मेल: coe@ycmou.digitaluniversity.ac

५. अध्ययन-साहित्य, पुस्तके, कार्यपुस्तिका इत्यादी

- भांडार व्यवस्थापक, भांडार व जावक कक्ष
  दूरध्वनी (०२५३) २२३०१०७ ई-मेल: ycmoustore@gmail.com

६. शिष्यवृत्ती

- शिष्यवृत्ती कक्ष, य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक
  दूरध्वनी (०२५३) २२३००५० ई-मेल : scholarship@ycmou.digitaluniversity.ac

७. संबंधित विभागीय केंद्र

❖ **महत्वाच्या सूचना :**

- विद्यार्थ्यांना शिक्षणक्रमाचे स्वयं अध्ययन साहित्य विद्यापीठाच्या संकेतस्थळावर केवळ .pdf स्वरुपात उपलब्ध करून देण्यात येईल. विद्यापीठाकडून छापील पुस्तके अभ्यासकेंद्र/ विद्यार्थी सहाय्यता केंद्रावर प्राप्त होईपर्यंत विद्यार्थ्यांनी http://ycmou.digitaluniversity.ac आणि www.ycmou.ac.in संकेतस्थळावर .pdf स्वरूपात उपलब्ध असलेली पुस्तके अभ्यासावीत.
- एखाद्या शिक्षणक्रमास महाराष्ट्रभरातून २० पेक्षा कमी विद्यार्थ्यांचे प्रवेश झाल्यास असा शिक्षणक्रम चालू शैक्षणिक वर्षामध्ये स्थगित ठेवण्याचा अधिकार विद्यापीठाला राहील. अशावेळी संबंधित शिक्षणक्रमाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांचे पूर्ण शुल्क परत करण्यात येईल.
- In case of less than 20 admissions to any Program (from entire State of Maharashtra), the university will have right to put the program on hold in the current academic year. In such case, total fees paid by the learner towards the Program fees will be refunded.

११. सायबर सुरक्षा अभ्यासक्रम (अनिवार्य ऑडीट कोर्स)

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या निर्देशानुसार यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने पदवी आणि पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमांना प्रवेशित विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा अभ्यासक्रम लागू केला असून या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०२४- २५ पासून केली जात आहे. सदर ऑनलाईन अभ्यासक्रम श्रेयांकशून्य (non-credit) ऑडीट कोर्स असून विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेला पदवी शिक्षणक्रम पूर्ण करण्यापूर्वी ०३ वर्षात पूर्ण करणे अनिवार्य असेल. **सायबर सुरक्षा अभ्यासक्रम उत्तीर्ण झाल्यानंतरच विद्यार्थ्यांना त्यांच्या मूळ पदवी शिक्षणक्रमाचे प्रमाणपत्र मिळेल.**

याबाबतची सविस्तर माहिती सोबतच्या परिशिष्ट ९ मध्ये देण्यात आली आहे.

अधिक माहितीसाठी संपर्क :

- मा. संचालक, संगणकशास्त्र विद्याशाखा, य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक
  दूरध्वनी (०२५३) २२३०७१७ ई-मेल : scmcs@ycmou.digitaluniversity.ac
- मा. संचालक, ऑनलाईन शिक्षण विद्याशाखा, य. च. म. मुक्त विद्यापीठ, नाशिक
  दूरध्वनी (०२५३) २२३०१९१ ई-मेल : dir_sol@ycmou.ac.in

१२. विभागीय केंद्रे

१. **अमरावती** : य. च. म. मुक्त विद्यापीठाचे अमरावती विभागीय केंद्र, वलगाव रोड, पोस्ट व्ही. एम. व्ही. अमरावती – ४४४ ६०४ दूरध्वनी क्र. (०७२१) २५३१४४५, ९५९५१९७०९९ ई-मेल: rd_amravati@ycmou.digitaluniversity.ac

२. **छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद)** : य. च. म. मुक्त विद्यापीठाचे संभाजीनगर विभागीय केंद्र, सर्व्हे नं. ४१, सैनिकी मुलांच्या वसतिगृहाच्या पूर्वेस, नंदनवन कॉलनी, छावणी, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) - ४३१००२ दूरध्वनी क्र. (०२४०) २३७१०७७, २३७१०६६, ९९२२९४२१७७ ई-मेल: rd_aurangabad@ycmou.digitaluniversity.ac

३. **कोल्हापूर** : य. च. म. मुक्त विद्यापीठाचे कोल्हापूर विभागीय केंद्र, शिवाजी विद्यापीठ परिसर, पोस्ट ऑफिसजवळ, विद्यानगर, कोल्हापूर - ४१६ ००४ दूरध्वनी क्र. (०२३१) २६०७०२२, २६०७०२३, ९४२३९७९६४५, ९४२३९७९७५०, ९४०४९६१४९६ ई-मेल: rd_kolhapur@ycmou.digitaluniversity.ac

४. **मुंबई** : य. च. म. मुक्त विद्यापीठाचे मुंबई विभागीय केंद्र, द्वारा: जगन्नाथ शंकरशेठ म. न. पा. ची मराठी शाळा, दुसरा मजला, फ्रेअर ब्रीज (साऊथ), नाना चौक, ग्रँट रोड (प.) मुंबई - ४०० ००७ दूरध्वनी क्र. (०२२) २३८७४१८०, २३८७४१८७, २३८७४१८३, ९९२२३७९३१९, ९८६९१९५६९५ ई-मेल: rd_mumbai@ycmou.digitaluniversity.ac

५. **नागपूर** : य. च. म. मुक्त विद्यापीठाचे नागपूर विभागीय केंद्र रावबहादूर डी., लक्ष्मीनारायण बंगला, विद्यापीठ क्रीडा परिसर, लॉ कॉलेज कॅम्पस, रवीनगर चौक, नागपूर - ४४० ००१ दूरध्वनी क्र. (०७१२) २५५३७२४, (०७१२) २५५३७२५, ९४०३७७४६०७, ९४०३७७४६२७ ई-मेल: rd_nagpur@ycmou.digitaluniversity.ac

६. **नांदेड** : य. च. म. मुक्त विद्यापीठाचे नांदेड विभागीय केंद्र, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाजवळ, नांदेड – ०६ दूरध्वनी क्र. ९६८९१७४८७८, ९४२२२४७२९६ ई-मेल: rd_nanded@ycmou.digitaluniversity.ac

७. **नाशिक** : य. च. म. मुक्त विद्यापीठाचे नाशिक विभागीय केंद्र, नाशिक महानगरपालिकेची जुनी इमारत, दुसरा मजला, नवीन पंडित कॉलनी नाशिक - ४२२००२ दूरध्वनी क्र. (०२५३) २३१७०६३, ९४०३७७४७०६ ई-मेल: rd_nashik@ycmou.digitaluniversity.ac

८. **पुणे** : य. च. म. मुक्त विद्यापीठाचे पुणे विभागीय केंद्र, शाहीर अण्णाभाऊ साठे प्रशालागृह, महापालिका शाळा क्र. ५ (मुलांची), ६५४, सदाशिव पेठ हौदासमोर, कुमठेकर मार्ग, पुणे - ४११ ०३० दूरध्वनी क्र. (०२०) २४४५७९१४, २४४९११०७, ८३२९२५६७३६ ई-मेल: rd_pune@ycmou.digitaluniversity.ac

१३. परिशिष्टे

परिशिष्ट १ : उमेदवार / विद्यार्थी करारनामा

हा करार विद्यार्थी किंवा उमेदवार आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ (यचममुवि) यांच्यामध्ये, विद्यार्थी / उमेदवार याने 'Accept' ह्या बटनावर क्लिक केल्यामुळे आपोआप अस्तित्वात आलेला आणि दोन्ही पक्षांना मान्य, कबूल आणि वैध असलेला मानण्यात येईल. या करारनाम्यात 'उमेदवार' या संज्ञेचा वापर अशा व्यक्तींसाठी करण्यात आला आहे की जो यचममुविमार्फत राबविण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमात प्रवेश घेऊ इच्छितो आणि 'विद्यार्थी' या संज्ञेचा वापर अशा व्यक्तींसाठी करण्यात आलेला आहे, ज्या व्यक्तीने यचममुविमार्फत राबविण्यात येणाऱ्या शिक्षणक्रमास विहित पद्धतीचा अवलंब करून प्रवेश घेतला आहे.

उमेदवार असे मान्य व कबूल करतो की,

१. त्याने माहितीपुस्तिका तसेच संगणक पडद्यावर उपलब्ध असलेल्या मजकुराचा, माहितीचा, सूचनांचा व्यवस्थित पद्धतीने अभ्यास केला आहे आणि त्यानुसार योग्य त्या कृती केल्या आहेत.

